

निकोलाय येफिमोव

ही एक वेगळी जीवनपद्धती आहे

निकोलाई येफिमोव

ही एक वेगळी जीवनपद्धती आहे

१९८३

मूल्य : एक रुपया

IT'S A DIFFERENT WAY OF LIFE

By

Nikolai Yefimov

IT'S A DIFFERENT

Marathi] [1983

Nikolai yefimov.

ही पुस्तिका भारतातील सोविएत वकिलातीच्या माहिती-विभागाच्या वतीने ए. बी. विओत्स्कीन यांनी मे. 'ज्ञानमुद्रा', सी ३९, रॉयल इंडस्ट्रीयल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, मुंबई–४०० ०३१ येथे छापून 'सोविएत देश' ऑफिस. ५१–एल, भुलाभाई देसाई रोड, मुंबई–४०० ०२६ येथे प्रसिद्ध केली.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

ज्याप्रमाणे पृथ्वीतलावर कोणत्याही दोन व्यक्ती संपूर्णतः एकसारख्या नसतात, त्याचप्रमाणे सर्वस्वी एकसारख्या अशा कोणत्याही दोन जनता नसतात. भूगोल, इतिहास, हवामान, युगानुयुगांच्या परंपरा आणि चालीरीती यांच्यामुळे प्रत्येक राष्ट्राला स्वतःचे अननुकरणीय व्यक्तिमत्व लाभते. ह्या आपल्या आगळ्यावेगळ्या अद्वितीयपणामुळे आपणास एकमेकांविषयी औत्सुक्य वाटते.

सोविएत संघराज्यात लहानमोठ्या अशा शंभराहून अधिक राष्ट्रांचे वास्तव्य आहे; आणि ही राष्ट्रे १३० भाषा आणि बोली बोलतात व पाच लिप्या उपयोगात आणतात.

या राष्ट्रांपैकी प्रत्येक राष्ट्राची स्वतःची अशी काही खास वैशिष्टचपूर्ण उपलक्षणे आणि स्वभावधर्म आहेत; आणि ते अगदी स्वाभाविक आहे. त्याचवेळी १९१७ सालच्या महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांती नंतरच्या साडेसहा दशकात सोविएत जनता अनेक सामायिक प्रवृत्ती विकसित झाल्या असून त्यांच्यामुळेच आज त्यांची जीवनपद्धती निश्चित होत असते. आज ह्यात असलेल्या सोविएत जनापैकी प्रचंड बहुसंख्या सोविएत कालखंडात जन्मलेली आहे. आणि त्यांची व्यक्तिमत्वे समाजसत्तावादी समाजाच्या परिस्थितीत घडविण्यात आली आहेत. कवि त्वार्दोवस्की यांच्या शब्दात सांगायचे म्हणजे " रशिया बदललेला आहे आणि त्याच्या समवेत आम्ही बदललो आहोत. "

आज आम्ही कसे आहोत ? ह्या नव्या समाजाच्या परिस्थितीत आमचे जीवन कसे निश्चित होत आहे ?

ह्याच प्रश्नाचे उत्तर ह्या छोटयाशा पुस्तिकेत जेवढे हिच्या छोटया आकारात बसेल तेवढे देणे हाच हिचा उद्देश आहे.

---

* आलेक्सान्द्र त्वार्दोवस्की (१९७०–७१) ० मुरावियाची भूमी–वसिली–त्योर्किन, रस्त्याकडची झोपडी, अजुनि चालतोचि वाट, इत्यादी कवितांचा लेखक.

ही अेक वेगळी जीवनपद्धती आहे

आमच्या देशाच्या पुढील पाच वर्षाचा विकास निश्चित करणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या सोविएत दस्तऐवजात गेल्या दहा ते पंधरा वर्षात "समाजसत्तावादी जीवनपद्धती" हा शब्दप्रयोग हमखास आढतो.

"जीवनपद्धती" ही संकल्पना तशी नवी नाही. कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एन्गल्स यांच्या प्रारंभीच्या ग्रंथात तो आढळतो. मार्क्स यांनी लिहिले की, उत्पादनाच्या प्रत्येक पद्धतीशी मिळतीजुळती अशी एक "निश्चित जीवनपद्धती" असते.

शास्त्रशुद्ध कम्युनिझमच्या संस्थापकांनी ओळखले होते की, जागतिक प्रांगणात समाजसत्तावादाचा उदय झाल्यानंतर तो अपरिहार्यपणे एक नव्या धर्तीचे जीवन विकसित करील आणि ठसवील; ही जीवनपद्धती भांडवलदारी पद्धतीपेक्षा मूलतः वेगळी असेल, आणि ती केवळ नवा समाज निर्माण करणारी असेल इतकेच नव्हे तर नवी जनताही निर्माण करील.

तथापि, सत्तेचे संक्रमण होऊन ती जनतेच्या हाती आल्यानंतर, जणू काही दुसऱ्याच दिवशी समाजसत्तावाद नवीन जीवनपद्धती घडवू शकला नाही आणि आपल्या सर्व सुप्त शक्तींचे प्रत्यंतर देऊ शकला नाही. प्रथम शक्तिशाली आर्थिक पाया उभारणे अत्यावश्यक होते, आणि या कामाला वेळ लागला. ते काहीही असले तरी १९३० च्या दशकातच या नव्या व्यवस्थेचे हेवा वाटण्याजोगे फायदे सोविएत संघराज्याने सप्रयोग दाखवून दिले, उदाहरणार्थ बेकारीचा अभाव आणि अर्थव्यवस्थेचा नियोजित, अरिष्ट–मुक्त आणि वेगवान विकास. ह्या कालखंडाविषयी लिहिताना आपल्या **आत्मचरित्रात** जवाहरलाल नेहरू यांनी लिहिले आहे की, "सोविएतांचे साक्षात अस्तित्व आणि उदाहरण म्हणजे सध्याच्या या अंधःकारमय आणि निराशाजनक जगातील तेजस्वी व उत्साहवर्धक घटना होय."

सोविएत जनतेला युगानुयुगाच्या आर्थिक मागासलेपणावर मात करून समाजसत्तावादाच्या भौतिक पायाची उभारणी करावी लागली. आम्ही जेव्हा विकसित

भांडवलदारी देशांशी शांततामय स्पर्धा सुरू केली तेव्हा आम्हाला प्रचंड संकटांना तोंड द्यावे लागले. पाश्चात्य देशांना आमच्यापुढे केवढी तरी ठसठशीत आघाडी इतिहासानेच दिली होती. १९२१ च्या एप्रिल महिन्यात व्लादिमीर लेनिन यांनी लिहून ठेवले आहे की, "रशियन फेडरेशनच्या नकाशाकडे पहा. वोलोग्दाच्या उत्तरेकडील, दोन नदीवरील रोस्तोव आणि सारातोव यांच्या आग्नेयेकडे, ओरेन्बुर्ग आणि ओम्स-च्या दक्षिणेकडे आणि तोम्सच्या उत्तरेकडे पसरलेल्या या अफाट भूभागावर डझनावारी मोठ्या प्रगत राज्यांना नांदायला वाव आहे. आज येथे पितृसत्ताक समाज पद्धती अर्ध–बर्बरता आणि राजरोस बर्बरता नांदत आहेत."

१९१७च्या ऑक्टोबर क्रांतीनंतर लगेच कम्युनिस्ट पक्ष आणि सोवएत सर-कार यांच्यापुढे तीन प्रमुख कामे होती : देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणणे, त्याची संरक्षणक्षमता बळकट करणे आणि जनतेचे राहणीमान सुधारणे परंतु ही तिन्ही कामे एकाचवेळी आणि सारख्याच जलद गतीने करण्यासाठी लागणारा. पुरेसा पैसा सरकारी तिजोरीत नव्हता.

आधुनिक उद्योगधंदे निर्माण करणे, प्रचंड बहुसंख्याक लोकांना अगदी ग, म, भ, न पासून शिक्षण देणे, गिरण्या, घरे, शाळा, रूग्णालये आणि महाविद्यालये उभारण्यासाठी साधनसामुग्री शोधणे, देशाचा कारभार कसा चालवावा याचे शिक्षण शेतकऱ्यांना आणि कामगारांना देणे, आणि सरकार म्हणजे श्रीमंताचा, प्रतिष्ठितांचा प्रांत होय, हा जुना पूर्वग्रह त्यांच्या मनातून काढून टाकणे. अशा प्रचंड समस्या जगातील पहिल्या समाजसत्तावादी सरकारपुढे होत्या. ही प्रचंड कामे करण्यासाठी काही महिनेच नव्हेत, तर काही वर्षे आणि काही दशकेसुद्धा आवश्यक होती. आणि ही उद्दिष्टे गाठण्याच्या मार्गात अनेक अडथळे होते, उदाहरणार्थ भूतकाळातील नीतिनियम व रूढी, सोविएत विरोधी शक्तींनी केलेल्या घातपातासह होणारा प्रतिकार आणि आमच्या स्वतःच्या चुका आणि चुकलेले अंदाज. याची आठवण ठेवावीशी वाटते की, न मळलेल्या वाटेने आम्ही जात होतो. व ज्याच्या अनुभवातून शिकावे असे कोणीही नव्हते. कारण असा अनुभव अस्तित्वातच नव्हता. आणि देशाबाहेरून कायमचा धोका होता. तो म्हणजे निर्वाणीचे खलिते, व्यापारी आणि राजनैतिक बहिष्कार, सरहद्दी-वरील सशस्त्र हल्ले आणि शेवटची गोष्ट म्हणजे फॅसिस्ट आक्रमणाचा धोका.

भांडवलदारी देशांनी सुरू केलेल्या युद्धांमुळे सोविएत जनतेवर प्रचंड संकटे कोसळली. १९१८–२० या मुदतीत चौदा राज्यांनी केलेला सशस्त्र हस्तक्षेप, आणि त्यांच्याच पाठिंब्याने झालेले यादवी युद्ध यांच्यामुळे ८० लक्ष लोक प्राणास मुकले.

आणि १९४१–४५ साली नाझी जर्मनीच्या हल्ल्यात दोन कोटी लोक मरण पावले. आर्थिक नुकसानीचे आकडे तर आभाळाला भिडणारे होते.

या सर्वांच्यामुळे शांततामय उभारणीसाठी लागणारा निधी दुसरीकडे वळवावा लागला. आमच्या प्रगतीला खीळ बसली आणि समाजसत्तावादी जीवनपद्धतीच्या स्थापनेचा मार्ग रोखला गेला. पण त्याच्यापायी तो संपूर्णतः थांबविता आला नाही.

समाजसत्तावादी उभारणीच्या संबंध कालखंडात समाजसत्तावादी जीवनपद्धती आकार घेत होती. आणि ती काही स्वयंस्फूर्तीने अस्तित्वात येत नव्हती. तर कम्युनिस्ट पक्षाच्या मार्गदर्शनाखाली घडत होती. लेनिन यांनी लिहून ठेवले आहे की, "मूलगामी सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक अशा कालखंडाचा अंदाज करण्याची संधी इतिहासात क्वचितच मिळते. ती आता आपल्याला मिळालेली आहे, वस्तुतः पाच वर्षांत काय करता येईल आणि कशाला पुष्कळच अधिक वेळ लागतो, हे आपल्याला आता स्पष्टपणे दिसते. समाजसत्तावादी पद्धतीनुसार जगण्याची आणि काम करण्याची कामगार आणि शेतकऱ्यांची प्रयत्नशीलता पक्षाने सातत्याने आणि चिकाटीने जोपासली. व्यक्ती–व्यक्तींच्या दरम्यान आणि व्यक्ती व समाज यांच्या दरम्यान आलेल्या संबंधात जे जे नवे अस्तित्वात येत होते, त्या सगळ्याचे पक्षाने रक्षण केले व लोकप्रिय केले.

१९०५–१९०६ साली झारच्या सरकारात पंतप्रधान असलेल्या सर्गेई वित्ते यांनी कबूल केले होते की "रशियाची मुख्य उणीव म्हणजे सार्वजनिक शिक्षणाचा अभाव होय. आपण प्रगत राष्ट्र आहोत असा दावा सांगणाऱ्या कोणत्याही राष्ट्रात शिक्षणाचा एवढा अभाव दिसून येणार नाही." बोल्शेविकांनी यादवीयुद्ध अजून चालू असतानाच या मुख्य कामालाच हात घातला. लेनिन यांच्या पुढाकाराने निरक्षरता निर्मूलनासाठी अखिल राष्ट्रीय जादा कमिशन स्थापन करण्यात आले.

आणि संपूर्ण शिक्षणव्यवस्थेची पुनर्घटना करण्यात आली. १९१८ – सर्व शैक्षणिक पातळ्यावरील शिकविण्याबद्दलची फी रद्द करण्यात आली, १९२० ते १९३० – ४८ जनता व वांशिक गट यांच्या भाषांना लिप्या नव्हत्या त्या विकसित करण्यात आल्या. १९३४ – सार्वत्रिक चतुर्वर्षीय शिक्षणाचे संक्रमण पूर्ण करण्यात आले, १९३३ ते ३७ मोठ्या व छोट्या शहरांतील तसेच वस्त्यांवरील सप्तवर्षीय शिक्षणाचे संक्रमण पूर्ण झाले. महान देश रक्षणाचे युद्ध (१९४१ ते १९४५) सुरू होण्याच्या सुमारास सार्वत्रिक सप्तवर्षीय शिक्षणाकडे वाटचाल सुरू करण्याची तयारी देश करीत होता. पण नाझी जर्मनीच्या आक्रमणामुळे त्याला प्रतिबंध झाला. महायुद्धानंतर ३२,००० शाळा आणि उच्च शिक्षणाच्या ३३४ संस्था यांच्या

मारती उध्वस्त झालेल्या होत्या. परंतु एवढे असूनही शिक्षणाची प्रगती चालूच राहिली. १९५६ – सप्तवर्षीय शिक्षण संबंध देशात जारी करण्यात आले. १९५८ – सक्तीचे आठ वर्षाचे शिक्षण लागू करण्यात आले, आणि १९७७ साली सोविएत संघराज्याच्या नव्या घटनेने माध्यमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करण्यास (फीशिवाय) कायद्याचे पाठबळ दिले. तरी एकही भांडवलदारी राज्य याबाबत असे अभिमानाने म्हणू शकणार नाही.

आमच्या समाजाच्या विकासाची सध्याची अवस्था परिपक्व समाजसत्तावादाची अवस्था असून त्यात समाजसत्तावादी जीवनपद्धतीचे पुष्कळच प्रत्यंतर दिसून येते. आज सोविएत संघराज्याजवळ उत्पादनाचा शक्तिशाली पाया आहे. त्याची आर्थिक शक्ती प्रचंड वाढली आहे. (सोविएत सत्तेचा उदय झाला तेव्हा जागतिक उत्पादनात आमचा वाटा १/५० होता तो आता १/५ झाला आहे, एवढे सांगितले म्हणजे पुरे). आणि अधिक महत्त्वाकांक्षी सामाजिक समस्या हाताळण्यासाठी त्याची ताकद त्या प्रमाणात वाढली आहे.

लिओनिद ब्रेझनेव यांनी म्हटले आहे, "सोविएत राजवटीच्या प्रारंभीच्या काळापासून कष्टकरी जनतेची परिस्थिती सुधारण्यासाठी शक्यतो सर्व उपाय योजण्याची पराकाष्ठा पक्षाने व सरकारने केली. परंतु आपल्या देशात समाजसत्तावादाची स्थापना करणे अवघड होते. कारण प्रदीर्घ काळपर्यंत आपल्याला जीवनमरणाचा, अस्तित्त्व टिकण्याचा लढा द्यावा लागला. ...आज परिस्थिती बदललेली आहे, कोटयावधी लोकांच्या चिकाटीने, शौर्यशाली श्रमशक्तीने, आज आपल्या देशात, प्रगत समाजसत्तावादी समाज निर्माण करण्यात आला आहे आणि आजदेखील देशातील आर्थिक सुप्त शक्तींचा वेगवान विकास घडविण्यासाठी आणि देशाच्या संरक्षणासाठी शाश्वती निर्माण करण्यासाठी आपल्याला प्रचंड रकमा बाजूला काढून ठेवाव्या लागतात. पण आज आपल्यापाशी संपत्तीची उगमस्थाने पूर्वीपेक्षा अगणित पटींनी अधिक आहेत व जे करावेसे सातत्याने वाटत आले आहे, ते आता करणे शक्य झाले आहे. आणि ते म्हणजे सोविएत जनतेच्या समृद्धीत वाढ करणाऱ्या पक्षाच्या व्यावहारिक कामावर जोर देणे."

"जनतेच्या भौतिक, सांस्कृतिक आणि इतर गरजा प्रत्यक्षपणे भागविता येतील अशा सामाजिक उत्पादनाच्या शाखांचा विकास करणे" आता शक्य झाले आहे, कारण देशात प्रचंड उत्पादक शक्ती निर्माण झाल्या आहेत, असा महत्वाचा निष्कर्ष १९६६ साली भरलेल्या सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या २३व्या अधिवेशनाने काढला. सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या २४व्या (१९७१), २५व्या (१९७६), आणि २६ व्या (१९८१) अधिवेशनानी जनतेच्या भौतिक स्वास्थ्याचा व सांस्कृतिक पातळीचा



वीस लाखांहून अधिक मुले सोविएत संघराज्यात पूर्वप्राथमिक बालकमंदिरात जातात.



लक्षणीय विकास करण्याचे उद्दिष्ट देशासमोर ठेवले. देशाने एवढी प्रगती केली आहे की, जनतेचे वास्तविक उत्पन्न दर पंधरा वर्षांनी दुपटीने वाढते, समाजातील वाढलेल्या संपत्तीच्या उगमस्थानामुळे समाजसत्तावादी जीवनपद्धतीचा आणखी विकास घडवून आणण्यावर अनुकूल प्रभाव पाडणे अधिक शक्य झाले आहे.

याबाबतीत सध्याची अकरावी पंचवर्षीय योजना (१९८१–८५) दिशा दाखविणारी आहे. या कालखंडात केवळ राष्ट्रीय उत्पन्नच वाढणार आहे एवढेच नव्हे तर, मालाचे उत्पादन खूपच वाढणार आहे. १९८० मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रत्येक १,००० रूबलमधील ७५३ रूबल उपभोग्य मालावर खर्च झाले. १९८५ साली ह्याच आकडा ७८० रूबलवर पोचेल. ह्यामुळे सोविएत सरकारला जनतेचे वास्तविक उत्पन्न १६.५ टक्क्यांनी शक्य झाले एवढेच नव्हे, तर घरबांधणी, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यासाठी मोठमोठ्या रकमा गुंतविणे देखील शक्य झाले.

भौतिक पाया निर्माण करण्याबरोबर इतर महत्त्वाच्या प्रक्रिया सुरू झाल्या, उदाहरणार्थ व्यक्तिमत्त्वाची समाजसत्तावादी धर्तीची घडण, जनतेचा नवा ऐतिहासिक समूह – सोविएत जनता–आकार घेऊ लागला. श्रमाकडे पाहण्याचा जुना दृष्टिकोन जाऊन त्याजागी नवा, सामुदायिक व्यवहाराचा कम्युनिस्ट दृष्टिकोन मूळ धरू लगला. व्यवस्थापन आणि प्रशासन यांचे नवे प्रकार अस्तित्वात आले आणि त्यातील कसब कोट्यवधी लोकांनी आत्मसात केले. जनतेची सांस्कृतिक पातळी लक्षणीय प्रमाणात उंचावली.

याच कारणास्तव समाजसत्तावादी जीवनमार्गाची संकल्पना दर पंचवार्षिक कालखंडासाठी देशाच्या विकासासाठी मार्गदर्शक सूत्रे सांगणाऱ्या दस्तऐवजांमध्ये प्रामुख्याने सादर होऊ लागली.

भांडवलदारी जीवनपद्धतीची व्याख्या करताना पाश्चात्य सैद्धांतिक वेगळा दृष्टिकोन स्वीकारतात. त्यांच्यापैकी काहीजण मुख्य मुख्य अशी खास वैशिष्ठ्ये वगळून अप्रत्यक्ष संबंध असलेल्या काही वैशिष्ठ्यांचाच समावेश त्यामध्ये करतात. उदाहरणार्थ समाजशास्त्रज्ञ ॲशले मॉंटेग्यू यांनी आपल्या **अमेरिकन जीवनपद्धती** या पुस्तकात बेकारी, सामाजिक अडसर आणि वांशिक विषमता ह्या कोट्यवधी लोकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या जिव्हाळ्याचा महत्त्वाच्या विषयांवर अवाक्षरही लिहिलेले नाही, तर इतर लेखक "जीवनपद्धती" या संकल्पनेच्या जागी "जीवनशैली' किंवा "जीवनाची गुणवत्ता" किंवा "जीवनाची नवी गुणवत्ता" या संकल्पनेची स्थापना करतात. व वाचकांची दिशाभूल करतात. प्रचंड वैज्ञानिक व तंत्रविषयक प्रगती होऊनही समाजातील अत्यंत महत्त्वाचे सामाजिक

प्रश्न सोडविण्यात विकसित भांडवलदारी देशांना अपयश आले आहे, या वस्तुस्थिती-कडून वाचकांचे लक्ष ते भलतीकडेच वळवतात : भांडवलशाही कष्टकरी जनतेला "सुखसोयींनी युक्त अशा जीवनाची" हमी देऊ शकते. संपूर्ण व्यवस्था क्रांतिकारक रीतीने मोडण्याची आवश्यकता नाही – फक्त जीवनाची "गुणवत्ता" सुधारण्याची गरज आहे, असे भांडवलदारी प्रचारक कंठरवाने सांगत असतात.

भांडवलशाही जीवनपद्धतीची समीक्षा करण्यात त्यांच्यात कितीही मतभेद असले, तरी एका बाबतीत भांडवलदारी सैद्धांतिकाचे एकमत असते. तिचा सामाजिक आशय अंधुक करण्याचा ते प्रयत्न करतात, लेनिन यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास "तुम्ही लुटा किंवा लुटले जा, तुम्ही दुसऱ्यासाठी राबा किंवा स्वतःसाठी दुसऱ्यांना राबवा." या तत्त्वावर उभारलेल्या समाजाचे समर्थन करतात. अशा समाजात त्याप्रकारची नीतिमत्ता आणि त्याच प्रकारची जीवनपद्धती निर्माण होते. अमेरिकन जीवनपद्धती ही आदर्श होय, असे पाश्चात्य प्रचारक प्रतिपादितात. पण तेलखाणींचे महाराजे आणि तेलभर-णाच्या केंद्रावरील हरकामे किंवा राखीव वस्तीत कोंबलेले बेकार भारतीय यांची जीवनपद्धती सारखीच आहे कां? लेनिन यांनी दाखवून दिले आहे की, प्रतिस्पर्धी वर्गात जर समाज विभागला गेला असेल तर प्रत्येक सामाजिक स्तराची "स्वतःची जीवनपद्धती, स्वतःच्या अशा सवयी आणि आवडीनिवडी असतात."

सर्व सामाजिक स्तरांसाठी एकसारखी जीवनपद्धती फक्त समाजसत्तावादी जीवनपद्धतीत आकार घेत आहे. फरेंच लेखक ज्याँ-रिचर्ड ब्लॉक यांनी सोविएत संघराज्याविषयी लिहिले आहे की "त्या देशात एकच एक जनता असून तिला समान शिक्षण मिळते आणि तिचा दृष्टिकोन सर्वत्र एकसारखाच असतो. सगळ्यांना सर्व अधिकार उपभोगता येतात. कुणालाही, कोणत्याही सामाजिक स्तराला दुसऱ्याला लुबा-डून आपली सुबत्ता वाढविण्याचा हक्क नाही."

समाजसत्तावादी जीवनपद्धतीत पुढील वैशिष्टये समाविष्ट आहेत :–

— सामाजाला विभागणाऱ्या विरोधी वर्गीयांच्या सामाजिक अडसरांचा अभाव, समाजात अधिक सामाजिक एकजिनसीपणा, सर्व मित्रवर्गांच्या आणि स्तरांच्या मूलभूत हितसंबंधातील ऐक्य, सामायिक जागतिक दृष्टिकोन.

— पिळवणूकरहित श्रमशक्ती. एखाद्या व्यक्तीची किंमत त्याच्या सामाजिक वंशावरून किंवा बँकेतील शिल्लक रकमेवरून न ठरता, तो कसे कोणते श्रम करतो आणि नव्या समाजाच्या उभारणीसाठी कसा हातभार लावतो, यावरून ठरते. श्रम म्हणजे ओझे रहात नाही, तर तो सन्मान ठरतो. काम करून माणूस आत्मसन्मान मिळवितो.





मॉस्कोतील एक नवीन शाळा

— लोकांमधील संबंधात सामुदायिक

— सर्वांची काळजी घेणारा समाज धर्म राष्ट्र, किंवा लिंग कोणतेही असो सर्व नागरिकांना मूलभूत राजकीय व सामाजिक हक्क. त्यात काम करण्याचा हक्क. विश्रांती व फुरसदीचा वेळ मिळण्याचा हक्क, आरोग्य संरक्षणाचा हक्क, म्हातारपणात भौतिक देखभालीचा हक्क आणि शिक्षणाचा हक्क यांचा समावेश आहे.

— आपला उद्योग, आपला जिल्हा, आपले प्रजासत्ताक आणि आपला संपूर्ण देश यांचा कारभार चालविणाच्या कामी कोटयवधी लोकांचा व्यापक सहभाग.

— लोक-लोकांमधील नवे संबंध आणि राष्ट्रगटांच्या प्रश्नांची सोडवणूक.

— स्त्रियांची मुक्तता.

— समाजसत्तावदी आशावाद आणि जनतेस भवितव्याविषयी विश्वास.

— मानवाची आत्मिक संपत्ती, सांस्कृतिक विकास, सुसंजस अशा गरजांची परिपूर्ती आणि स्वास्थ्यसमृद्धीत वाढ हे अंतिम साध्य नसून प्रत्येकाचा आणि सर्वांचा संपूर्ण व सुसंवादी विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेली शर्त आहे. ही जाणीव.

समाजसत्तावादी आणि भांडवलशाही जीवनपद्धतींची तुलना केल्यास अपरिहार्यपणे मुख्य प्रश्न उभे राहतात ते असे: ही सामाजिक पद्धती न्याय्य आहे का ? प्रत्येकाच्या विकासासाठी अनुकूल आहे का ? प्रत्येकाचा विकास घडवून आणण्यासाठी शक्यता निर्माण होते का ? तिच्यातील नीतिमूल्य आणि मानवी संबंध माणुसकीचे आहेत का ?

ह्या प्रश्नांमळेच सोविएत संघराज्य आणि इतर समाजसत्तावादी देश यांच्या विषयी औत्सुक्य स्वाभाविकपणेच निर्माण होते.

सामाजिक अडथळ्यांशिवाय

भूतकाळात सर्व वर्गयुक्त समाजात विषमता आणि सामाजिक अन्याय अंगभूत होते. या दुष्ट प्रथांपासून जनतेची मुक्तता कशी करता येईल, या प्रश्नाचे उत्तर देण्याचाच सातत्याचा प्रयत्न तत्त्वज्ञांनी आणि लेखकांनी, बंडखोरांनी आणि क्रांतिकाऱ्यांनी केला.

ह्या पुरातन प्रश्नाचे उत्तर आता सापडले आहे. सोविएत संघराज्य आणि इतर समाजसत्तावदी राष्ट्रे ह्यांच्या अनुभवाने दाखवून दिले आहे की, सामाजिक विषमता नसलेला समाज निर्माण करावयाचा झाल्यास उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी नष्ट केलीच पाहिजे. ह्या खाजगी मालकीमुळेच माणसाची माणसा-

कडून पिळवणूक होते. ज्यांचे एकमेकांशी कधीही पटणार नाही अशा वर्गात लोक विभागले जातात आणि सामाजिक विषमता व अन्याय फोफावतो.

उत्पादनांच्या साधनांचा सार्वजनिक मालकीने समाजाच्या जीवनात व मानवी संबंधात गुणात्मक बदल घडवून आणला आहे. आता भांडवलातून नव्हे तर प्रत्येकाला आपल्या श्रमातून उदरनिर्वाहाचे साधन मिळते. प्रत्येकाने कष्ट करूनच आपला उदरनिर्वाह केला पाहिजे हे नवे, समाजसत्तावादी समाजाचे तत्त्व ज्या समाजात पिळवणूक करणारे वर्ग अस्तित्त्वात आहेत, आणि जेथे समाज, मालक आणि श्रमिक यांच्यात विभागला गेला आहे, तेथे कधीही अंमलात येऊ शकत नाही.

रशियात ऑक्टोबर १९१७ ची क्रांती होण्यापूर्वी मालमत्ताधारी वर्ग भांडवलदार, जमीनमालक, व्यापारी, कुलक (मोलाने मजूर लावणारे श्रीमंत शेतकरी) मिळून एकूण लोकसंख्येच्या, १६.३ टक्के होते. श्रमिक जनता अत्यंत गरीब होती. तिच्यापैकी अनेकजण विलक्षण दारिद्र्यात जगत होते. सोविएत सरकारच्या प्रारंभीच्या काही वर्षातच जमिनीचे, मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करून महत्त्वाचे बदल घडवून आणण्यात आले. अर्थव्यवस्थेत कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या सरकारने हुकुमी अशी उच्चस्थाने पटकावली. जमीनमालक आणि भांडवलदार यांना वर्ग या नात्याने राजकीयदृष्टया नेस्तनाबूत करण्यात आले. १९३० च्या दशकाच्या मध्यास देशाच्या औद्योगिकीकरणानंतर आणि शेतीचे सामुदायिकीकरण झाल्यानंतर उद्योगधंद्यात खाजगी उद्योगपती, ग्रामीण भागात कुलक, किंवा व्यापारी कोणीही उरले नव्हते. अशा रीतीने पिळवणूक करणाऱ्या वर्गाशिवाय असलेला समाज आकार घेत होता.

सोविएत सत्तेच्या साडेसहा दशकांच्या कालखंडात सामाजिक रचनेत प्रचंड बदल घडून आले आहेत. पहिली गोष्ट म्हणजे कामगारवर्ग बदलला आहे. आता कामगाराला आपली श्रमशक्ती खाजगी व्यक्तीला विकावी लागत नाही. समग्र जनतेची मालमत्ता असलेल्या उद्योगधंद्यात ते आता काम करतात. समाजातील अग्रेसर शक्ती म्हणून ते स्वतःचे सरकार चालवितात. कामगारवर्गाची संख्यात्मक वाढ झालेली आहे. (१९२० साली एकूण लोकसंख्येत त्यांचे प्रमाण १०–१२ टक्के होते. ते १९८० साली ६०.५ टक्के झाले. त्याची शैक्षणिक व सांस्कृतिक पातळी खूपच उंचावली १,००० लोकसंख्येत माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण १९३९ साली ८७ होते, ते वाढून १९५९ साली ४०१, १९७० साली ५९० तर १९८१ साली ७८७ पर्यंत गेले.

दुसरा सामजसत्तावादी वर्ग, म्हणजे शेतकरी सामुदायिक शेतात (शेतकरी सहकारी संघटनात) संघटित झाला. त्याचे लोकसंख्येशी प्रमाण १३.८ एवढे आहे.

अर्ध्या शतकामागे जे प्रमाण होते, त्यामानाने हे खूपच कमी आहे. शेतीचे यांत्रिकीकरण केल्याने शेतावर राबणाऱ्या श्रमिकांची संख्या कमी होते. गेल्या वीस वर्षात सोविएत संघराज्याची ग्रामीण भागातील लोकसंख्या १,००,००,००० लोकांनी कमी झाली आहे. ती प्रक्रिया सबंध जगभर चालू आहे. समाजसत्तावादी संबंधात त्यामुळे कोणतेही सामाजिक प्रश्न निर्माण होत नाहीत. एकेकाळचे सामुदायिक शेतकरी शहरात येतात, तेव्हा त्यांना काम मिळते, घर मिळते आणि नवे कसब शिकण्याची संधी मिळते. क्रांतीपूर्व काळातील रशियाच्या लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोक अशिक्षित असून जमीन कसत असत. त्यांच्याशी आजच्या सामुदायिक शेतकऱ्यांचे अजिबात साम्य नाही. ग्रामीण भागातील निरक्षरता सोविएत सरकारच्या प्रारंभीच्या काळातच नाहीशी करण्यात आली. १९४० मध्ये ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक १०० माणसांपैकी फक्त ६ माणसांनी उच्च किंवा माध्यमिक शिक्षण घेतलेले असे, आज हा आकडा ६० वर गेला आहे. माध्यमिक शिक्षण आज जसे शहरात सक्तीचे आहे तसेच ग्रामीण भागातही सक्तीचे आहे. शेतीचा भौतिक व तंत्रविषयक पाया वेगाने विकसित होत आहे. धान्ये, कापूस, आंबाडी आणि इतर पिकांची पेरणी व कापणी करण्याच्या बहुतेक प्रक्रियांचे जवळजवळ संपूर्ण यांत्रिकीकरण करण्यात आले आहे. तंत्रविषयक ज्ञान आणि विशेष प्रशिक्षण आवश्यक असलेले नवे उद्योग अस्तित्वात आले आहेत.

बुद्धीजीवी लोकांचीही वाढ वेगाने झाली. (१९२६ साली ते ३,००,००० होते ते १९८० साली ४,००,००,०००झाले.) जगातील कोणत्याही देशात एवढ्या मोठ्या संख्येने बुद्धिजीवी नाहीत. संबंध जगातील वैज्ञानिक कार्यकर्त्यांपैकी १/४ आणि डॉक्टरांपकी १।३ सोविएत संघराज्यात आहेत.

समाजसत्तावादी व्यवस्थेत कामगार वर्ग आणि शेतकरी यांच्यात काही भेद आहेत, कारण समाजसत्तावादी मालमत्तेत दोन प्रकार अस्तित्त्वात आहेत. (समग्र जनतेची म्हणजेच सरकारची मालमत्ता आणि सामुदायिक शेताची व सहकारी मालमत्ता). तसेच औद्योगिक व शेतकी उत्पादनाच्या विकासाची पातळी वेगवेगळी आहे. हे भेद अटीतटीचे नसले, तरीही महत्त्वाचे आहेत. विशेषकरून कामगारांच्या आणि सामुदायिक शेतकऱ्यांच्या मिळकतीत लक्षणीय फरक आहे. १९६५ साली सामुदायिक शेतकऱ्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे खरे उत्पन्न औद्योगिक कामगाराच्या उत्पन्नाच्या मानाने ७५ टक्क्यांएवढे होते. १९८० साली हा आकडा ८९ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ही तफावत आणखी कमी व्हावी असेच धोरण व व्यवहार सोविएत कम्युनस्ट पक्ष अंगिकारीत असतो, आणि प्रत्येक नवी पंचवर्षीय योजना आम्हाला ह्या उद्दिष्टाच्या जवळ नेत असते. येथे अर्थातच आपण सरासरी प्राप्तीविषयी बोलत आहोत. उदाहरणार्थ

जर आपण शेतावरील यंत्रे चालविणारांची मिळकत विचारात घेतली (आणि त्यांची संख्या वेगाने वाढत आहे) तर आपल्याला असे दिसून येईल की, अनेकदा त्यांचे उत्पन्न औद्योगिक कामगारांपेक्षा जास्त असते.

लिओनिद ब्रेझ्नेव यांनी म्हटले आहे, "कामगारवर्ग, सामुदायिक शेतावरील किसान आणि बुद्धिजीवी यांना एकमेकांच्या निकट आणणे, शहरी व ग्रामीण भागातील, तसेच अंगमेहनतीचे काम व बुद्धीचे काम यांच्यातील भेद हळूहळू नष्ट करणे ह्याच दिशेने पक्षाचे धोरण आखलेले असते. वर्गविहीन कम्युनिस्ट समाजाची उभारणी करण्याच्या दृष्टीने हे एक मोक्याचे क्षेत्र होय."

सोविएत संघराज्याने गाठलेली सामाजिक एकजिनसीपणाची पातळी म्हणजे मानवजातीच्या इतिहासातील गुणात्मकदृष्टया एक नवीन घटना होय. परस्पर-विरोधी वर्गात विभागल्या गेलेल्या भांडवलदारी समाजात असा एकसंधपणा आणणे शक्य आहे का?

गेल्या शतकाच्या मध्याला ब्रिटिश जनतेविषयी बोलताना ब्रिटिश पंतप्रधान बेंजामिन डिझ्रेली यांनी "दोन राष्ट्रे" असा उल्लेख करून खालचे वर्ग आणि उच्चभ्रू वरिष्ठ समाज यांच्यातील तफावतीवरच भर दिला होता. आपल्या कालखंडात ती गोष्ट ब्रिटिश मजूर पक्षाने मान्यच केली आहे. आपल्या धोरणविषयक निवेदनात त्याने म्हटले आहे की, आर्थिक व सामाजिकदृष्टया ब्रिटन अजूनही दोन राष्ट्रात विभागलेलेच आहे.

अमेरिकन अध्यक्षपदाची आकांक्षा धरणारे अध्यक्षीय निवडणुकीच्या मोहिमेतील उमेदवार बऱ्याच वेळा आपल्या भाषणात बरीच खरीखुरी माहिती बोलून जातात. (मते मिळविण्यासाठी बराचसा त्याग करावा लागतो!) १९६७ साली अमेरिकेतील सामाजिक परिस्थितीची वैशिष्टचे सांगताना जेम्स कार्टर म्हणाले होते, निर्णय घेणाऱ्या राजकीय व आर्थिक अशा वरिष्ठ उच्चभ्रूंच्या कृत्यांमुळे असंख्य लोकांना हाल सोसावे लागतात, पण त्यांना त्यांच्या चुकांबद्दल कधीही जबाबदार धरले जात नाही आणि अन्यायाची झळ त्यांना कधीच लागत नाही. ह्या लोकांना कधीही बेकारांच्या रांगेत उभे रहावे लागत नाही. आणि त्यांना कधीही अन्न, वस्त्र किंवा निवारा याची उणीव भासत नाही, असेही त्यांनी सांगितले.

सामान्य मतदारांना त्यांच्याकडून जे ऐकावेसे वाटत होते, तेच कार्टर यांनी सांगितले. लोकप्रियता मिळविण्याच्या स्पर्धेत त्यांनी काही गुण जास्त मिळविले. परंतु ते अध्यक्ष होते, त्या कारकिर्दीत त्यांच्या देशातील परिस्थिती सुधारली नाही. बेकारी, वाढली, आणि तशीच चलनवाढही जास्त झाली. अमेरिकन जनतेच्या निम्म्या

लोकांजवळ जेवढी मालमत्ता आहे, त्याच्या आठ पट मालमत्ता अमेरिकन लोकसंख्ये-च्या एक टक्का लोकांजवळ आहे. अशा परिस्थितीत वरीष्ठ उच्चभ्रू आणि सामान्य कामगार यांच्यात कोणत्या प्रकारची एकता निर्माण होऊ शकेल?

"दोन राष्ट्रे" दोन विरोधी उद्दिष्टचे बाळगतात – एकाचा प्रश्न असा असतो की, अन्याय्य व्यवस्था सवलती देऊन किंवा निर्घृण दडपशाही करून टिकवून धरणे, तर दुसऱ्याला ही व्यवस्था नष्ट करावीशी वाटते.

या पुस्तिकेच्या लेखकाने ब्रिटनमधील कामगार संघाच्या अनेक सभांना हजर राहून पाहिले आहे की, कामगार संघाचे सभासद होणाऱ्या प्रत्येक नव्या सभासदाला एक खास आवाहन सादर केले जाते. त्या आवाहनात म्हटलेले असले की, "मालक वर्गाने केलेल्या प्रदीर्घ व कडव्या विरोधाला न जुमानता एकजूट करण्याचा आपला हक्क आपण गमवला आहे. हे तुम्ही लक्षात ठेवा, असे आम्ही आपल्याला सांगतो... हा विजय मिळवणे सोपे नव्हते...कामगारांची परिस्थिती सुधारण्यास मालकवर्गाने सदैव विरोध केलेला आहे...

वस्तूंची सुबत्ता असताना ज्या व्यवस्थेत बेकारी आणि दारिद्र्य निर्माण होते, ती व्यवस्था नष्ट करण्याएवढी ताकद कामगारांच्या एकजुटीत येईल, तो दिवस तुम्हाला पाहायला मिळो, आणि या जुन्या व्यवस्थेच्या जागी समाजासाठी उपयुक्त सेवा करणाऱ्या सर्वांना समृद्ध व सुखी जीवनाची हमी मिळेल, अशी न्याय्य व समतेवर आधारलेली व्यवस्था निर्माण होईल, असा दिवस तुम्हाला दिसो."

वर्गावर्गातील तफावत लपवून ठेवण्यासाठी, कमी लेखण्यासाठी किंवा त्याबाबत दिशाभूल करण्यासाठी भांडवलदारी प्रचारकांनी केवढे तरी प्रयत्न केले आहेत, कितीतरी पैसा त्यांनी खर्च केला आहे आणि कितीतरी प्रकारचे सिद्धांत डोक्यातून काढले आहे. पाश्चात्य देशात असे सिद्धांत पावसाळी छत्र्यांप्रमाणे उगवतात : "लोकांची भांडवलशाही" "कल्याणकारी समज", "नवी क्षितिजे", "सामाजिक भागीदारीचा समाज" इत्यादी. प्रत्येकाचे उद्दिष्ट छोटे असते आणि ध्येयही फसवे असते, मात्र त्या सर्वांचा आशय सारखाच असतो. खाजगी मालमत्ता ह्या संस्थेचे जतन करणे आणि समाजाच्या मूलभूत पुनर्रचनेच्या लढ्यापासून कष्टकरी जनतेला दुसरीकडे वळविणे.

" उत्पादनाचे मालक बनणे " ह्याचा अर्थ काय ?

मार्क्स आणि एंगल्स यांनी भविष्य जाणले होते की, नवा लोकसमुदाय निर्माण करण्याचा कामी नव्या सामाजिक व्यवस्थेला अपयश येणे शक्य नाही, आणि जगा-





कीएव मधील बेकरी.

दोनेत्स्क युक्रेनी शहरातील खाण कामगारांचे पथक

तील समाजसत्तावादी राष्ट्राने हे भविष्य तंतोतंत खरे असल्याचे दाखवून दिले आहे.

आपला स्वतःचा उद्योगधंदा, सामुदायिक शेत, शहर आणि संबंध देश हा आपण स्वतः काळजी घेण्याचा व वैयक्तिक जबाबदारीचा विषय आहे, अशी भावना प्रत्येक नागरिकात असणे, हे समाजसत्तावादी जीवनपद्धतीचे खास वैशिष्टय होय. अशी भावना काही आपोआप निर्माण होत नाही. प्रदीर्घ कालाखंडानंतरच ही निर्माण होते. या बाबतीत अद्यापही बरेच काही करण्यासारखे आहे, कारण जगाकडे पाहण्याचा जुना दृष्टिकोन लोकांच्या मनावर शतकानुशतके बिंबविण्यात आलेला आहे. पण आता तो बदलू लागला आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तुनिष्ठ पूर्वावश्यकता समाजसत्तावादाने निर्माण केल्या आहेत.

ह्या पूर्वावश्यकता काय आहेत ?

"उत्पादनाचे मालक" ह्या कल्पनेला आता संपूर्णपणे नवा अर्थ प्राप्त झालेला आहे. आता मालक याचा अर्थ जो काम करतो तो. शिवाय, एकाद्या व्यक्तिचे मूल्यमापन करण्याचा निकष म्हणजे त्याचे काम, असे आता झाले आहे. पश्चात्य देशात असलेल्या परिस्थितीपेक्षा ही स्थिती नेमकी उलट आहे. अमेरिकन अध्यक्षपदाचे उमेदवार रॉबर्ट केनेडी, त्यांचा खून झाला, त्यांनी आपल्या "**अधिक नव्या जगाच्या अपेक्षेत**" म्हटले आहे, "...बहुधा आपण एखाद्या माणसाची किंमत त्याच्या पगारावरून किंवा त्याच्या मालकीच्या वस्तूच्या संस्थेवरून करतो, अशी त्यांची (नवजात राष्ट्रांतील लोकांची—संपादक) समजूत आहे... याहूनही महत्वाची गोष्ट म्हणजे, प्रत्येक बाबीचे मोल त्याच्या नफ्यावरून करण्याची जी पद्धत हजारो वर्षांपासून नीतिवाद्यांनी अवलंबिली आहे, तिच्याविषयी तरूणांना तिटकारा वाटतो."

नव्या समाजाने हे नीतिमूल्य आणि त्याचा निकष दोन्हीही ठामपणे नाकारले आहे. याहून वेगळे काही होणे शक्यच नव्हते. समाजसत्तावादी उद्योगातील कामगाराचे प्रत्येक काम त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधाशी आणि समाजाच्या हितसंबंधाशी सुसंगत असेच असते. उदाहरणार्थ, कामगारांचे उत्पादन जेवढे जास्त आणि त्या मालाचा दर्जा जेवढा अधिक चांगला, तेवढी त्याला स्वतःला आणि सबंध समाजाला मिळणारी भौतिक आणि सांस्कृतिक संपत्ती जास्त.

सोविएत संघराज्यात श्रमाविषयी आदरयुक्त वातावरण निर्माण करण्यात आले आहे. जे श्रमाबाबतच्या सर्जनशील दृष्टिकोनाने उदाहरण घालून देतात, जे फलनिष्पत्तीचे उत्कृष्ट उद्दिष्ट गाठतात आणि जे मनःपूर्वक सद्भावनेने काम करतात त्यांना सहकाऱ्यांमध्ये प्रतिष्ठा लाभते आणि सरकारकडून सन्मान बहाल केले जातात.

सोविएत संघराज्यात आपण उत्पादनाचे मालक आहोत ही भावना सर्व कष्टकरी लोकांत असली तरी गैरव्यवस्थापन, उदासीनता आणि कामाचा निकृष्ट

दर्जा असलेलीही काही प्रकरणे दिसतात, हे खेदाने नमूद केले पाहिजे. ते काहीही असले, तरी समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनावरून विशेषतः उरालमधील उद्योगधंद्याच्या संशोधनावरून त्यांनी दाखवून दिले आहे की, बहुसंख्य कामगार आपापल्या उद्योगधंद्यात खरेखुरे वैयक्तिक स्वारस्य दाखवून काम करतात.

"**सोविएत कामगारांचे आत्मिक जग**" ह्या ग्रंथात लेखकांनी म्हटले आहे की, "ज्या ज्या कामगारांच्या मुलाखती आम्ही घेतल्या त्यातील बहुसंख्य कामगारांना कामाची आवड दिसून आली आणि त्यांना आपल्या कामातून नैतिकदृष्ट्या समाधान मिळाल्याचे दिसले. . .आपण जे काम करतो, त्याचे त्यांच्या कारखान्याच्या दृष्टीने, सरकारच्या दृष्टीने व जनतेच्या दृष्टीने असलेले महत्त्व ते जाणून आहेत आणि कामकऱ्यांचा सामुदायिक गट व संबंध समाज यांच्याबद्दलच्या जबाबदारीच्या जाणिवेतून व आंतरिक प्रेरणेने आमच्यात काम करण्याची इच्छा निर्माण होते, असे त्यांनी सांगितले. समाजाची काळजी घेण्याची वृत्ती ह्यातून व्यक्त होते, असे म्हणण्यास भरपूर आधार आहे."

भांडवलदारी देशातील कामगारांना ही वृत्ती अत्यंत अनोळखी आहे. ज्या कामगाराचे काम उद्यादेखील सुटू शकेल असा धोका आहे, तो स्वतःला उत्पादनाचा मालक कसा काय समजू शकेल? खाजगी व्यक्तींच्या मालकीच्या कंपनीतील घडामोडींबद्दल त्याला स्वतःला चिंता का वाटावी ?

स्पर्धा करण्याची वृत्ती ही माणसात अंगभूत असते. पण भांडलशाहीने तिचे स्वरूप विकृत केले व तिच्याजागी गळेकापू चढाओढ, शत्रुत्व निर्माण केले. **अमेरिकन जीवनपद्धती** ह्या आपल्या पुस्तकात ॲशले मॉंटेग्यू ह्यांनी स्पर्धेविषयी काय लिहिले आहे पहा – "अमेरिकन जीवनपद्धतीतील एक तत्व म्हणजे स्पर्धेची कल्पना. तिची अभिव्यक्ती साधीसुधी असते. बाहेर पडा आणि दुसऱ्यापेक्षा चांगले काम करून दाखवा. मग या प्रक्रियेत त्या दुसऱ्या माणसाला किंवा त्याच्या कुटुंबाला तुमच्याकडून इजा करावी लागली, तरी त्याबद्दल चिंता करायचे तुम्हाला कारण नाही. शेवटी तुम्हाला तुमच्या कुटुंबाचाच विचार केला पाहिजे. आपल्या स्पर्धेचा परिणाम इतरांवर काय होईल, याबाबतची याप्रकारची उदासीनता स्पर्धेच्या तत्त्वातच भरून राहिलेली असते."

निसर्गाने मानवात निर्माण केलेल्या चांगल्या प्रवृत्तींचे भांडवलशाहीने विकृतीकरण केले आहे. भांडवलशाहीचे भाट असा दावा करतात की, स्पर्धेमुळे उद्योगांची वाढ होते. नव्याचे आकर्षण निर्माण होते. हे खरेही आहे. पण स्पर्धेमुळे फक्त एवढेच गुण जोपासले जातात, असे समजणे चूक आहे. तिच्यामुळे निर्दयता आणि

कमालीची आत्मकेंद्रितता सुद्धा निर्माण होते. "माणूस हा माणसाचा मित्र आहे." हे तत्त्व त्यामुळे झाकाळून जाते.

उद्दिष्टांचे एकत्व, व्यवस्थापनात सहभाग, समग्र लोकांची मालमत्ता असलेल्या कारखान्यात काम करणे, ह्या सर्व बाबी सामुदायिक वृत्ती जोपासण्यास अनुकूल अशाच आहेत.

आमचे सैद्धांतिक प्रतिस्पर्धी म्हणतात की, व्यक्तिवादामुळे माणसातील सुप्तशक्ती विकसित होतात तर सामुदायिकत्वामुळे त्या बोथट होतात. परंतु हा खोटा सिद्धांत प्रत्यक्ष जीवनातूनच नाशावीत झाला आहे. सामुदायिक गट हा व्यक्तींचाच बनलेला असतो. आणि त्यांच्यातील प्रत्येकाचे व्यक्तिमत्व जेवढे संपन्न, तेवढा तो गट अधिक संपन्न व अधिक शक्तिशाली. अशा सामुदायिक गटातच खरोखर सर्वोत्कृष्ट मानवी गुणांचा विकास होतो – अशा गटातच माणूस ज्ञान मिळवतो. व्यावसायिक कसब अंगी बाणवतो व मान्यता प्राप्त करून घेतो. अशा सामुदायिक गटातच त्याला दयाळूपणा, बंधुभावाचा पाठिंबा व साह्य मिळते आणि तोही दुसऱ्याला देतो, अशा सामुदायिक गटातच तो आपल्या अंगातील सर्जनशील शक्तींचा अंदाज घेऊ शकतो व उत्पादनाची व्यवस्था पहाण्यास शिकतो.

लोकशाहीच्या वेगवेगळ्या कूटपद्धा

समाजसत्तावादी लोकशाहीविषयी भांडवलदारी प्रचारकांनी सत्य दडपण्याचे, वस्तुस्थिती विकृत करण्याचे जेवढे जोरदार हल्ले चढवले आहेत, तेवढे आमच्या जीवनपद्धतीच्या दुसऱ्या कोणत्याच बाबीवर त्यांनी चढवले नसतील. आमच्या आर्थिक किंवा वैज्ञानिक यश:सिद्धी विकृत करणे किंवा त्यांच्याकडे शांतपणे काणाडोळा करणे अधिक कठीण आहे. तरीदेखील ते केले जाते. चंद्र किंवा शुक्रावरील आंतरग्रहीय केंद्रावर अलगद उतरणे किंवा ग्रहांच्या कक्षेतील स्थानकावर अंतरिक्ष वैमानिकांनी केलेले कार्य स्वयंसिद्ध असते. अर्थव्यवस्था, विज्ञान व संस्कृती या क्षेत्रात सोविएत संघराज्याने मिळविलेले यश पाश्चात्य राष्ट्रे मोठ्या उदारपणे " मान्य " करतात, पण समाजसत्तावादी लोकशाहीचा विकास मात्र ते मान्य करीत नाहीत. लोकशाहीची मक्तेदारी फक्त पाश्चात्यांकडेच आहे, असे पाश्चात्य वृत्तपत्रांच्या वाचकांना व दूरचित्रवाणीच्या प्रेक्षकांना सातत्याने सांगितले जाते.

सोविएत कम्युनिस्ट पक्षाने २५व्या काँग्रेसनंतर (१९७६) समाजसत्तावादी लोकशाही आणखी व्यापक करण्याचे व तिची अंमलबजावणी करण्याचे ठोस प्रयत्न केले. ऑक्टोबर १९७७ मध्ये सोविएत संघराज्याची नवी घटना मंजूर करण्यात

आली. या घटनेचा मसुदा सर्व वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केला होता व १४ कोटी लोकांनी त्याच्यावर चर्चा केली होती. याचा परिणाम म्हणून मसुद्याच्या ११० कलमात दुरूस्त्या करण्यात आल्या व एक नवे कलम त्यात घालण्यात आले. नव्या घटनेत प्रत्येक सोविएत नागरिकाला मिळणाऱ्या हक्कांची व स्वातंत्र्याची हमी – उदाहरणार्थ घर मिळण्याचा हक्क, आपले काम किंवा व्यवसाय आपल्या आवडीनुसार व कुवतीनुसार निवडण्याचा हक्क व आरोग्यसंरक्षणाचा हक्क–अधिक व्यापक करण्यात आलेली आहे. या घटनेने सार्वत्रिक माध्यमिक शिक्षण (दहा वर्षांचे) सक्तीचे केले आहे, व समाजातील श्रमिकांच्या सामुदायिक गटातील त्याचे स्थान उंचावले आहे. आता हे श्रमिकांचे सामुदायिक गट सर्व सरकारी व सार्वजनिक घडामोडींवरील चर्चेत भाग घेऊ शकतात व निर्णय घेऊ शकतात, तसेच उत्पादन व सामाजिक विकास यांचे नियोजन करणे, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व नेमणुका करणे, उद्योगधंद्याच्या व संस्थांच्या व्यवस्थापनाशी निगडीत अशा बाबींवर चर्चा करणे व निर्णय घेणे, लोकांच्या कामाची व राहाण्याची स्थिती सुधारणे वगैरे बाबींवरील चर्चेतही भाग घेण्याचा व निर्णय घेण्याचा हक्क आता त्यांना प्राप्त झालेला आहे सोविएत संघराज्याच्या घटनेत जे जे नवे आहे, ते क्रमशः घटक संघ, प्रजसत्ताकांच्या घटनातही समाविष्ट करण्यात आले. तदनंतर स्थानिक सोविएतांचे हक्क * व अधिकार व्यापक करणारे कायदे करण्यात आले. आता जे उद्योगधंदे व संघटना त्यांच्या प्रदेशात आहेत, परंतु जे त्यांना प्रत्यक्षात जबाबदार नाहीत अशांचे सुसूत्रीकरण व नियंत्रण करण्यात त्यांना अधिक वाटा मिळालेला आहे. उत्पादन व सामाजिक विकास याविषयीच्या प्रश्नांबाबत निर्णय घेण्याचे जास्त अधिकार आता श्रमिक सामुदायिक गटांना मिळाले आहेत.

सोविएत संघराज्याच्या घटनेच्या ९ व्या कलमात म्हटले आहे :

"सोविएत समाजाच्या राजकीय व्यवस्थेच्या विकासाची प्रमुख दिशा म्हणजे समाजसत्तावादी लोकशाहीचा विस्तार होय. उदाहरणार्थ, समाजाच्या व सरकारच्या व्यवहाराची व्यवस्था पहाण्यात नागरिकांचा अधिक व्यापक सहभाग, शासनयंत्रणेत सतत होत जाणारी सुधारणा, सार्वजनिक संघटनांच्या हालचालीत वाढ, जनतेच्या नियंत्रणाची पद्धत अधिक भक्कम करणे, सरकारच्या व सार्वजनिक जीवनातील कार्यपद्धतीचा कायदेविषयक पाया आणखी भक्कम करणे, अधिक खुलेपणा व प्रसिद्धी आणि लोकांच्या मताला सातत्याने प्रसिद्धी देणे.


---

* लोकांच्या प्रतिनिधींची सोविएते – या संस्थांमार्फतच लोक सरकारी सत्तेचा वापर करतात व सोविएत संघराज्याच्या राजकीय पायाची उभारणी त्यांच्यावरच झाली आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास शासनाच्या कारभारात लक्षावधी लोकांनी सहभाग घेणे व शासनाच्या दर्जा सुधारणे ही साठ वर्षांपूर्वी सुरू झालेली प्रक्रिया आजही चालू आहे.

पाश्चात्य देशात असे नेहमी म्हटले जाते की, लोकशाही स्वातंत्र्य म्हणजे सर्वप्रथम प्रत्येकाला आपल्या मनातले बोलून दाखविण्याचे, निषेध नोंदविण्याचे, संप करण्याचे व प्रचार आणि निदर्शने संघटित करण्याचे स्वातंत्र्य होय. ह्या भांडवलदारी राष्ट्रात जेथे प्रत्येकाला आपले मत मांडता येते व टीका करण्याची शक्यता असते. ह्या गोष्टीचे महत्व कमी लेखता कामा नये, यात मुळीच संशय नाही. परंतु लोकशाही या बाबींनी सुरू होते. यापेक्षा त्याला अधिक महत्व नाही. भांडवलदारी राष्ट्रात सामान्य नागरिकांना ह्या शक्यता कितपत उपभोगता येतात, हा एक वेगळाच प्रश्न आहे, हेही जाता जाता नमूद केले पाहिजे. दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या इंग्रज नागरिकाला विचारा की, त्याचे भाषणस्वातंत्र्य व दि टाईम्सच्या मालकाचे भाषण स्वातंत्र्य यांची तुलना करणे शक्य आहे काय. किंवा पश्चिम• जर्मनीतील कामगारांचे भाषण स्वातंत्र्य व ॲक्सेल्स स्प्रिंगर ह्या प्रचंड प्रकाशनगृहाच्या मालकाचे भाषणस्वतंत्र्य यांची तुलना होऊ शकेल काय. भांडवलदारी लोकशाही औपचारिकपणे जाहीर करते की प्रत्येक अमेरिकन नागरिक अध्यक्ष होण्याची सुप्त शक्यता असते. (त्याने "फक्त" कोट्याधीश असले पाहिजे). व प्रत्येक इंग्रजी माणूस द टाइम्सचा मालक होऊ शकतो (हे अध्यक्षीय खुर्चीपेक्षा थोडे स्वस्त आहे, पण दोहोत फारसा फरक नाही.) अमेरिकेचे अध्यक्ष—ज्यांचा खून झाला त्या जॉन केनेडी यांचे वडील जोसेफ केनेडी म्हणत असत की, आपल्याजवळ असलेल्या पैशाच्या बळावर ते आपल्या मोटारड्रायव्हरला देखील कॉंग्रेसवर निवडून आणू शकतील.

पाश्चात्य जगात अखेरीस लोक निषेध का करतात? आपल्या न्याय्य मागण्या खऱ्या लोकशाही मार्गाने कामगार मिळवू शकत नाहीत म्हणूनच ना? ते निषेध करू शकतात. पण जेथे ते काम करतात ते उद्योगधंदे ते चालवू शकत नाहीत उदाहरणार्थ स्टर्न या जर्मन नियतकालिकाने मान्य केले आहे की, कामगारांच्या सर्व संस्थांना कंपनीच्या मालकाच्या व्यक्तिगत निर्णयावर अवलंबून रहावे लागते, हे जाचक आहे. लंडन शहरातील टॉवर हॅम्लेट व कॅमडेन जिल्ह्यातील घरभाड्याविरूद्ध (ही भाडेवाढ घरमालकांनी केलेली) तेथील रहिवाशांनी किती वेळा निषेध निदर्शने केली? त्यांनी भाडे द्यायला नकार दिला, दरवाजात अडथळे निर्माण केले, सभा घेतल्या, अर्जावर सामुदायिक सह्या गोळा केल्या. ही लोकशाही नव्हे काय? पण त्या अडथळ्यांना किंवा त्या निषेधाचा काहीही उपयोग झाला नाही. पोलिसांनी





सोविएत संघराज्यांत ६ कोटी औद्योगिक कामगार आहेत.

भाडेकरूंना घराबाहेर काढले आणि त्या अर्जांचा घरमालकांवर काहीही परिणाम झाला नाही.

आता असे सांगा की, अधिक लोकशाहीवादी काय आहे : निषेध करणे व फक्त निषेधच करणे, की सगळी राहती घरे सार्वजनिक मालमत्ता ठरविणे आणि अर्ध्या शतकात भाड्यात अजिबात वाढ न करता व खाजगी मालकांच्या आणि त्यांच्या कचेऱ्यांच्या संमतीशिवाय ती घरे लोकांना वाटून देणे? अधिक लोकशाहीवादी काय आहे : आपल्या सहकारी कामगाराला विनाकारण बडतर्फ करण्याविरुद्ध निषेध म्हणून संपावर जाणे की, सोविएत संघराज्यात कायद्याने अशी हमी दिली आहे की, कोणाही कामगारास स्थानिक कामगार संघाच्या समितीच्या संमतिशिवाय बडतर्फ करता येणार नाही – हा हक्क वापरणे? समाजसत्तावादी लोकशाही व भांडवलदारी लोकशाही यांच्यातील मूलभूत फरक असे आहेत. द टाईम्सच्या क साहित्यिक पुरवणीत ब्रिटिश राजकीय उच्चभ्रू या पुस्तकाविषयी म्हटले आहे की, "या अगोदरच्या कोणत्याही पुस्तकात नसलेली अत्यंत विश्वसनीय अशी गेल्या शंभर वर्षातील राजकीय सत्ताधाऱ्याबद्दलची माहिती या पुस्तकात आहे." ह्या पुस्तकाचे लेखक ब्रिटिश समाजशास्त्रज्ञ विल्यम गटसमन यांनी शेवटी असा निष्कर्ष काढला आहे की, ब्रिटनमधील सत्ता भांडवलशाहीच्या आणि फक्त भांडलशाहीच्याच हातात आहे. "हा लोकशाहीला अडथळा आहे" असे जेव्हा गटसमन लिहितात तेव्हा ते फारच सौम्य विधान करतात. नाही, तो अडथळा मुळीच नाही, अजिबात नाही – भांडवलदारी लोकशाहीचा तो मूळ गाभाच आहे. कारण खरी लोकशाही आहे की नाही या प्रश्नाचे उत्तर, उत्पादनाची साधने – जमीन, गिरण्या, बँका आणि वाहतूक कुणाच्या मालकीची आहे – यावर अवलंबून असते. अलंकारिक भाषेत बोलायचे झाल्यास 'जो तळे राखील तो पाणी चाखील' जेथे मालकीच खाजगी आहे व कामगार भाडोत्री आहे, जेथे समाज मालमत्ताधारी व मालमत्ताहीन वर्गात विभागाला आहे, जेथे एक माणूस दुसऱ्याची पिळवणूक करतो- तेथे लोकशाही असूच शकत नाही.

सोविएत संघराज्यातील सर्व मालमत्ता अखिल जनतेच्या मालकीची आहे, याचाच अर्थ असा की कामगार आपापल्या कारखान्याचा कारभार, तसेच आपल्या शहराचा व्यवहार आणि संबंध देशाच्या कारभार चालविण्याच्या कामात सहभागी होतात. कारभार चालविण्यास जितके जास्त लोक सहभागी व क्रियाशील तितके समाजाच्या दृष्टीने अधिक चांगले.

सोविएत लोकशाहीच्या प्रकारांनी आणि तिच्या अंमलबजावणीच्या यंत्रणेने परिपूर्णता गाठली आहे, असे म्हणजे चुकीचे होईल. आमची लोकशाही विकासाची

वाट चालत आहे, लोकप्रतिनिधींच्या स्थानिक सोविएतांचे, श्रमिकांच्या सामुदायिक गटांचे आणि कामगार संघाचे अधिकार व्यापक करून व्यवस्थापनाच्या कामात अधिकाधिक मोठ्या जनसमूहांना सहभागी करून घेण्याच्या दिशेने वाट चालत आहे. समाजसत्तावाद म्हणजे सामुदायिक मालकी असणे, सामुदायिकरीत्या काम करणे व सामुदायिकरीत्या व्यवस्थापन करणे.

सार्वजनिक संघटनांचे हक्क व अधिकार कसे वाढले आहेत, ते कामगार संघाच्या उदाहरणावरून दिसून येईल :

१९३३ साली कामगार संघांना सरकारी सामाजिक विम्याचे प्रशासन करण्याचे व कामगारविषयक कायद्यांचे पालन होते की नाही यावर देखरेख करण्याचे अधिकार व्यवस्थापनाने दिले होते. १९३४ साली उपाहारगृहे व भांडारे चालवण्यावरील नियंत्रणाचा अधिकारदेखील त्यांना देण्यात आला १९५७ साली, कामगार व व्यवस्थापन यांच्यातील तंटयात मध्यस्थी करण्याचे हक्क स्थानिक कामगार संघाच्या समित्यांना देण्यात आले.

१९५८ साली कामगार संघाबाबतचे नवे नियम मंजूर करण्यात आले; त्यानुसार उत्पादनाचा विकास, वेतन, कामगारांची रहाण्याची स्थिती, सांस्कृतिक सेवा, विश्रांती व मनोरंजन वगैरेच्या संदर्भातील सर्व प्रश्न कामगार संघांच्या भागीदारीनेच सोडविले पाहिजेत, असे ठरविण्यात आले आहे. १९६० साली सर्व विश्रामधामे व आरोग्यधामे कामगार संघाच्या नियंत्रणाखाली देण्यात आली. ज्याप्रमाणे सर्व सार्वजनिक संघटना एखादा नवा कायदा पुढे मांडण्यात पुढाकार घेऊ शकतात, तसा पुढाकार घेण्याचा हक्क कामगार संघाना १९७० साली देण्यात आला; आणि १९७७ साली त्यांचा हा नवा हक्क सोविएत संघराज्याच्या घटनेत समाविष्ट करण्यात आला.

"सबंध संघराज्याच्या व स्थानिक महत्त्वाच्या अशा सर्व कायद्यांच्या व उपाय योजनांच्या बाबतीत विचारविनिमय करणे व ते मंजूर करणे, सरकारच्या व सार्वजनिक घडामोडींच्या व्यवस्थापनात व प्रशासनात भाग घेणे" हा प्रत्येकाचा हक्क आहे, असे सोविएत संघराज्याच्या घटनेने (कलम ४८) पुनर्घोषित केले आहे.

निवडणुकीने निर्माण होणाऱ्या सर्व संस्थांवर व लोकप्रतिनिधींच्या सर्व सोविएतांवर निवडून जाण्याची व निवडून देण्याची संधी, राष्ट्रव्यापी चर्चा व सार्वमत यात भाग घेणे, लोकनियंत्रणाच्या कामात सहभागी होणे, सरकारी समित्या, सार्वजनिक संघटना व स्थानिक सामूहिक गट यांच्या कामात सहभागी होणे, आणि

कामाच्या किंवा राहण्याच्या जागी होणाऱ्या सभांतून भाग घेणे, ह्या सर्व हक्कांची हमी देशाच्या मूलभूत कायद्यात देण्यात आली आहे.

मी माझ्या मोटार ड्रायव्हरलाही काँग्रेसमध्ये पाठवीन, असे जरी जोसेफ केनेडी म्हणाले असले, तरी सत्ताधारी पक्षाचा फक्त स्वतःवरच विश्वास असतो. अमेरिकेच्या काँग्रेसमध्ये जवळजवळ एकही कामगार किंवा शेतकरी नाही. तेथील स्त्रियांची किंवा कृष्ण वर्णीयांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतपत आहे. तर अमेरिकन सीनेट म्हणजे अमेरिकनांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे तो एक " कोट्याधीशांचा क्लब " आहे. इतर पाश्चात्य राष्ट्रांमध्येही परिस्थितीचे चित्र साधारण असेच आहे.

लोकप्रतिनिधींच्या सोविएतांची जडणघडण वेगळीच सामाजिक रचना दर्शविते. सर्वोच्च सोविएतमध्ये कामगार आणि सामुदायिक शेतकरी यांची संख्या निम्म्याहून अधिक आहे; तर स्थानिक सोविएतांत ती सुमारे ७० टक्के आहे. सोविएत संघराज्यातील शासकीय समित्यांच्या दहा अध्यक्षांत किंवा मंत्र्यांपैकी सातजण कामगार किंवा शेतकरी वर्गातून आलेले आहेत.

येथे दुय्यम दर्जाचे लोक नाहीत

बहुराष्ट्रीय असे सोविएत संघराज्य (१९२२) स्थापन झाल्यानंतर अवघ्या पाच दशकांनंतर कम्युनिस्ट पक्ष खंबीरपणे जाहीर करू शकला की, " भूतकाळातून आमच्याकडे आलेला राष्ट्रगटांचा प्रश्न संपूर्णतया, अंतिमतः आणि कायमचा सोडविण्यात आलेला आहे. "

अनेक भांडवलदारी राष्ट्रात हाच प्रश्न अजूनहि तीव्र आणि स्फोटकसुद्धा आहे.

पाश्चात्य देशातील राष्ट्रगटांच्या प्रश्नाचे मूळ कारण आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमतेत आहे. भांडवलदारी राष्ट्रांच्या प्रदीर्घ अस्तित्वात त्यांनी आपल्यातील अल्पसंख्य राष्ट्रगटांसाठी कधीही ' सरकार ' हा दर्जा निर्माण केलेला नाही. अमेरिकेत इंडियन लोकांसाठी असलेले आरक्षण किंवा दक्षिण आफ्रिकेत काळ्या लोकांसाठी असलेले 'घेट्टो' म्हणजे "सरकार"चा दर्जा—असे नक्कीच कोणीही म्हणणार नाही. अमेरिकेतील अधिकृत आकडेवारीवरून दिसते की, अमेरिकेतील एकूण अर्धशिक्षित लोकांपैकी काळ्या लोकांची संख्या गोऱ्यांच्या मानाने तिप्पट आहे, तर संपूर्ण निरक्षरांतील काळ्या लोकांची संख्या गोऱ्यांच्या मानाने पाचपट आहे, काळ्या लोकात बेकारीचे प्रमाण दुप्पट आहे, तर देशातील काळ्या तरूणांपैकी एकतृतीयांशांना कामच नाही. हे सरासरीने काढलेले आकडे आहेत. अमेरिकेतही अशी अनेक शहरे व अनेक जिल्हे आहेत की, येथील तरूण बेकारांची संख्या (मियामी प्रमाणे) ८० टक्क्यांपर्यंत पोचते.

अमेरिकन कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस गुस हॉल यांनी दाखवून दिले आहे की, काळ्या लोकांना कमी वेतन दिल्यामुळे मक्तेदार आणि सरकार यांना सालिना ७० अब्ज डॉलर जास्त नफा मिळतो. यात इंडियन्स पोर्टोरिकन्स आणि मेक्सिकन लोकांची असलीच पिळवणूक हिशोबात धरली तर हा वाढीव नफा १०० अब्ज डॉलरपर्यंत जातो.

अमेरिकेतील ७,००,००० इण्डियन लोकांची स्थिती विशेषच दुर्दैवी आहे. इंडियन्स आणि अमेरिकन सरकार यांच्यात झालेल्या ३०० करारांपैकी एकाचीहि अंमलबजावणी झालेली नाही, किंवा होत नाही, असा निष्कर्ष इंडियन लोकांच्या जीवनाची चौकशी करण्यासाठी काँग्रेसने नेमलेल्या मंडळाने काढला आहे. हिवाळ्याच्या महिन्यात इण्डियन लोकातील बेकारी ६०टक्क्यांपर्यंत पोहचते. गोऱ्यांच्या मानाने त्यांचे आयुर्मान एकतृतीयांशाने कमी असते. आणि क्षयरोगाने पछाडलेल्या काळ्या लोकांची संख्या सातपटींनी जास्त आहे. अॅशले मॉंटेग्यू लिहितात : " लोकशाही किंवा स्वयं-निर्णयासाठी जग सुरक्षित करण्याच्या नावाखाली आपण सशस्त्र दलासह किंवा त्याची धमकी दाखवून किंवा पैसा किंवा अन्न किंवा इतर वस्तूंचे आमिष दाखवून इतर राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करतो, परंतु अमेरिकेतील ज्या मूळ रहि-वाश्यांनी गोऱ्यांचे आपल्या भूमीवर प्रेमाने, मित्रत्वाने आणि कौतुकाने स्वागत केले, त्यांना लोकशाही फायदे मिळवून देण्याकडे मात्र दुर्लक्ष करतो.

मांडवलदारी राष्ट्रात दडपल्या जाणाऱ्या लोकांची यादी लांबलचक आहे. अल्स्टर मधील तद्देशीय आयरिश लोक; अमेरिकेतील पोर्टोरिकन व मेक्सिकन लोक; इस्रायलमधील अरब, कॅनडातील उत्तरेकडील लोक ह्या सर्वांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्यात आलेले आहे. त्यांच्या राष्ट्रीय हक्कांवर गदा आणण्यात आली आहे. युद्धोत्तर काळात पाश्चात्य राष्ट्रांत भूमध्यसागरी व अरब देशातून, आफ्रिकेतून, वेस्ट इण्डीज मधून आणि आशियातून आलेल्या १ कोटी निराश्रित कामगारांमुळे अशा दडपल्या गेलेल्या लोकांची संख्या खूपच फुगली होती. अशा कामगारांना धाक-दपटशा, लुबाडणूक व पिळवणूक यांचे लक्ष्य व्हावे लागते.

मोठ्या संख्येने परदेशातून येणाऱ्या, प्रामुख्याने गौरेतर कामगारांचा उपयोग सत्तारूढ वर्ग, कामगार वर्गात फूट पाडण्यासाठी आणि त्यांच्यात गोंधळ माजविण्या-साठी करतात उदा. बेकारी, घरांची टंचाई, गुन्ह्यांची वाढ आणि रूग्णालयातील रांगा या सर्वांचा दोष परदेशातून आलेल्या कामगारांच्या माथी मारण्यात येतो. फौंड्री वर्कर ह्या ब्रिटिश कामगार संघटनेच्या नियतकालिकाने नमूद केले आहे की, "नव्या फॅसिस्ट संघटना ह्या गौरेतर लोकांचा उपयोग समाजातील सर्व समस्यांसाठी बळीच्या बकऱ्यासारखा करीत आहेत."

झारशाही रशियात, राष्ट्रगटांचा प्रश्न देखील अत्यंत तीव्र होता. नानाविध राष्ट्रगटांच्या दरम्यान झारशाही मुद्दामच संघर्ष चेतवीत असे. दूरवरचे प्रदेश मागासलेले होते. काही लोक, विशेषत: उत्तरेकडील लोक—गट मृत्यूपंथाला लागले होते.

नवजात सोविएत सरकारला राष्ट्रगटांच्या प्रश्नाबाबत लाभलेला वारसा हा असा होता.

लोकालोकात आणि राष्ट्रगटात नव्या प्रकारचे संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य सोविएत सरकारने तात्काळ हाती घेतले. १९२३ मध्ये भरलेल्या १२व्या कॉंग्रेसने राष्ट्रगटांबाबतचे धोरण आखून दिले. त्यानुसार (अ) राष्ट्रगटांवर कोणत्याहि प्रकारची दडपशाही होता कामा नये (ब) आपापले भवितव्य ठरविण्याबाबत लोकांच्या समान आणि सार्वभौम हक्कास मान्यता (क) सहकार्य आणि स्वयंस्फूर्त सहभाग या तत्त्वांवर आधारलेले असेल, तरच लोकांची एकजूट टिकाऊ असते, याला मान्यता; (ड) भांडवलदारी जोखड झुगारून दिल्यानंतरच असे ऐक्य प्रस्थापित करणे शक्य आहे, ह्या सत्याची उद्घोषणा करण्यात आली. कॉंग्रेसने नमूद केले की, बाहेरून दीर्घकालीन व परिणामकारक मदत मिळाल्याशिवाय अनेक लोक व राष्ट्रगट विकासाच्या उच्चस्तर पातळीवर पोचू शकत नाहीत, आणि अशा रीतीने अधिक प्रगत राष्ट्रगटांच्या बरोबरीला येऊ शकत नाहीत."

सर्व राष्ट्रांना आणि राष्ट्रगटांना समाजसत्तावादी समाजाने सार्वभौम सरकारचा दर्जा प्राप्त करून दिला : संघ किंवा स्वायत्त प्रजासत्ताक स्वायत्त प्रदेश किंवा स्वायत्त विभाग सोविएत संघराज्यात असे ५३ राष्ट्र प्रकार आहेत. समाजसत्तावादाने केवळ सर्व लोकांची समानताच उद्घोषित केली इतकेच नव्हे; तर राष्ट्रगटांचा प्रश्न सोडविण्यास ती तेवढी समानता पुरेशी नव्हती तर प्रत्यक्ष असमानताच नष्ट करून टाकली. तुलनात्मकदृष्ट्या अधिक प्रगत अशा मध्यभागातील प्रदेशांच्या मानाने दूरवरच्या सरहद्दीवरील एकेकाळच्या मागासलेल्या प्रदेशांनी सोविएत कालखंडात अधिक वेगाने प्रगती केली. औद्योगिकीकरण व संशोधन केंद्रांची प्रस्थापना, शाळा व उच्चतर शिक्षण संस्थांची स्थापना यांचा बव्हंशी खर्च अखिल संघराज्याच्या अंदाजपत्रकाने सोसला. पक्षाचे धोरणच तसे होते. आज प्रत्येक संघ—प्रजासत्ताकात आधुनिक उद्योगधंदे, तेथील कामगार वर्ग, आणि आपला स्वत:चा बुद्धिजीवी वर्ग आहे. " दूरवरचे मागासलेले राष्ट्रप्रदेश " ही कल्पनाच आता अस्तित्वात राहिलेली नाही.

" सोविएत संघराज्य ही इतिहासातील एक विलक्षण घटना आहे " असे वर्णन क्युबाचे अध्यक्ष फिडेल कास्ट्रो यांनी केले आहे. मूलभूत उद्दिष्टांचा एकसंधपणा, वर्षानुवर्षे केलेल्या संयुक्त संघर्ष व श्रम यांच्यामुळे सोविएत लोक एकत्र राहिलेले

आहेत. सामायिक सुटचा, सामायिक परंपरा, सामायिक जागतिक दृष्टीकोन, आता अस्तित्वात आला आहे. सोविएत जनता नावाचा एक नवा ऐतिहासिक लोकसमुदाय तयार झाला आहे. सोविएत लोक-समुदायांचा एकजिनसीपणा व एकजूट यांचे ठस-ठशीत प्रत्यंतर महान देशरक्षणाच्या युद्धात आले होते. स्तालिनग्राद * मधील "पावलोव यांच्या घरावरील अयशस्वी हल्ल्यात नाझींना प्रचंड संख्येने सैनिक गमवावे लागले होते. त्या घराचे रक्षण सार्जंट पावलोव यांच्या नेतृत्वाखालील १२ राष्ट्रगटातील सैनिकांनी बनलेल्या पलटणीने केले. त्यांनी एकाच देशाचे, एकाच जनतेचे, एकच समाजव्यवस्थेचे संरक्षण केले. स्मशानभूमीतील सामुदायिक थडग्यांवरील शिलालेखांवर रशियन, यूक्रेनियन, श्वेतरशियन, कझाक, जॉर्जियन, उझ्बेक, ततार, आर्मेनियन आणि इतर राष्ट्रगटातील लोकांची नावे आहेत. समाजसत्तावादी मातृभूमीचे रक्षण सर्वांनीच केले.

कोणत्याहि सोविएत कारखान्यातील श्रमिक समुदाय हा बहुराष्ट्रीक असतो. **देर स्पायगेल** या पश्चिम जर्मन नियतकालिकाचे प्रतिनिधी नॉर्बर्ट कुचिन्के यांनी आमच्या जीवनपद्धतीच्या ह्या वैशिष्टयाची यथायोग्य नोंद घेतली आहे. त्यांनी लिहिले आहे, "सैबेरिया ही स्वतंत्र लोकांची भूमी आहे, शिवाय त्यांना राष्ट्रीय असमानता ठाऊकही नाही. विल्युई नदीवरील किझिल सिर वसाहतीत मला रशियन, याकुत, एस्तोनियन, युक्रेनियन असे २७ राष्ट्रगटांचे प्रतिनिधी भेटले. आणि ते सगळे एका कुटुंबातील घटकांप्रमाणे राहत होते. . .त्यांनी माझ्याशी एका परदेशी पत्र-प्रतिनिधीशी सर्व विषयांवर खुलेपणाने व मनमोकळेपणाने बातचीत केली आणि आपल्या मौलिक विचारांची व निष्कर्षाची मांडणी केली. विविध देशांच्या दौऱ्यात मला असे लोक भेटले नव्हते."

समाजसत्तावादी समाजात दुय्यम दर्जाचे लोक नाहीत. शिक्षण मिळणे, कारा-गिरी शिकणे, उच्चतर शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळणे, नोकरी, बढती, निवडून देण्याचा व निवडून येण्याचा हक्क या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांपैकी एकाही प्रश्न चामडीच्या रंगावर किंवा डोळ्यांच्या आकारावर अवलंबून नाही, एखाद्या माणसाचे मूल्यमापन त्याच्या कार्यक्षमतेवर, ज्ञानावर, आणि कसबावर केले जाते.

संमिश्र विवाह हे लोकगटातील चांगल्या, मित्रत्वाच्या संबंधांचे निदर्शकच आहे. समाजसत्तावादी समाजात आता ह्या सामान्य घटना झाल्या आहेत. लातविया, सैबेरिया, युक्रेन व कझाकस्तान आणि उझ्बेकिस्तान मधील चार किंवा पाच विवाहात एक संमिश्र असतो.

---

* आता वोल्गोग्राद

सोविएत माणूस हा आंतरराष्ट्रीयत्ववादी असतो, तो कोणत्याही लोकांचे वर्चस्व किंवा अद्वितीयत्व मान्य करीत नाही. एकत्र अभ्यास, आणि एकत्र काम- सोविएत जीवनाचे एकूण वातावरणच अशा विचारांना प्रोत्साहन देते. हद्दपारीत जगणारे दक्षिण आफ्रिकन लेखक अलेक्स ला गुमा सोविएत लोकांपुढे बोलतांना म्हणाले की, आम्हाला इथे एक चुकची, दुसरा कझाक, आणखी एकादा किरघीज, युक्रेनियन, रशियन वगैरे वगैरे दिसतात आणि खटला ? आपल्यावर होण्याची भीती नसलेले हे अविभाज्य लोक पाहून आम्हाला अत्यंत आनंद होतो.

जन्माने चुकची असलेले एक विख्यात सोविएत लेखक युरी रित्खेऊ म्हणाले, "अगदी बरोबर आहे. आज आमच्या देशात सुरू असलेला कोणताही मोठा उपक्रम सर्व सोविएत लोकांच्या प्रयत्नांनी उभारला जातो. . .आणि कोणालाही त्यात असा- धारण असे काही वाटत नाही. संमिश्र विवाहांनी जसे विशेष कोणी भारावून जात नाही, आणि हुषार लहान मुले जेव्हा म्हणतात : माझी आई चुकची आहे, बाबा युक्रेनी आहेत, आणि मी स्वत: सोविएत आहे. तेव्हा ते आपल्या चिमखड्या बोलांनी राष्ट्रीय प्रश्न'च जणु काही सोडवून टाकतात.

त्याबरोबरच राष्ट्रगटांच्या एकजुटीमुळे राष्ट्रीय परंपरा नष्ट होत नाहीत, राष्ट्रीय संस्कृती नष्टप्राय होत नाही. सोविएत राजवटीच्या कालखंडात एकेकाळी मागासलेले असलेल्या दूरवरच्या जिल्ह्यांनी मागासलेपणाच्या दुर्दैवावर मात केली; स्वत:चे वाङ्मय आणि कला निर्माण केली आणि अशा रीतीने समग्र सोविएत संघराज्याची संस्कृती अधिक संपन्न केली.

हक्क आणि हर्मी

तुर्गेनेव * यांच्या ग्रंथातील एका व्यक्तीचित्राला धूर्त आणि म्हाताऱ्या कोल्ह्याचा सल्ला आठवतो. "आपल्या शत्रूला भडकावायचे असेल किंवा त्याला इजा देखील करायची असेल, तर आपल्या स्वत:त असलेल्या एखाद्या दुर्गुणाबद्दल किंवा कमतरतेबद्दल त्याला फटकारा. उद्विग्नता दाखवा. . .कडक टीका करा."

पाश्चात्य प्रचारकांनी जवळ जवळ हाच मार्ग पत्करला आहे; "मानवी हक्कां- विषयी त्यांना चिंता वाटते– स्वदेशातील नव्हे, तर इतर देशातील – म्हणून.

---

* इवान तुर्गेनेव (१९१८–१८८३) रशियन लेखक. स्केचेस ऑफ ए स्पोर्टसमन या कथासंग्रहाचे व रुदिन, ए नेस्ट ऑफ जेन्टल फोक, ऑन दी ईव्ह, फादर्स ॲण्ड सन्स या कादंबऱ्यांचे आणि अन्य ग्रंथाचे कर्ते.

१९७३ साली मॉस्कोत भरलेल्या शांततावादी शक्तींच्या जागतिक कॉन्ग्रेस मध्ये केलेल्या भाषणात लिओनिद ब्रेझ्नेव यांनी म्हटले होते, "मानवी हक्कांबाबतचे गंभीर विचारविनिमय टाळण्याचे आम्हाला काहीच कारण नाही. आमच्या क्रांतीने आमच्या देशात समाजसत्तावाद विजयी झाल्यामुळे श्रमिक मानवाच्या हक्कांची आम्ही केवळ घोषणा केली. इतकेच नव्हे तर प्रत्यक्षात त्या हक्कांची हमी निर्माण केली. मग ते श्रमिक कोणत्याही राष्ट्रगटाचे असोत. जगातील कोणत्याही देशात भांडलवशाहीला हे शक्य झालेले नाही."

सोविएत संघराज्याची नवी घटना आणि सोविएत व्यवहार ह्या उद्गारांची सत्यता उत्कृष्टपणे पटवितात. देशातील मूलभूत कायदा दुसऱ्या कोणत्याही दस्तऐवजा-पेक्षा अधिक व्याप्तीने व अधिक परिपूर्णतेने सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क उद्घोषित करतो आणि ते अंमलात आणण्याची हमी प्राप्त करून देतो.

१९६६ साली संयुक्त राष्ट्रांनी संमत केलेल्या व सोविएत संघराज्याने पुरस्कार-लेल्या आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक, नागरी व राजकीय हक्कांबाबतच्या आंतरराष्ट्रीय सनदांच्या कितीतरी पुढे नवी सोविएत घटना याबाबतीत जाते. "प्रत्येकाला आपापले आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क; त्याचप्रमाणे नागरी व राजकीय हक्क उप-भोगण्याजोगी परिस्थिती निर्माण करण्यात आली, तरच भीती व टंचाई पासूनचे स्वातंत्र्य विमुक्त मानव उपभोगू शकण्याचे ध्येय गाठता येईल," असे त्या सनदात म्हटले आहे. अशी परिस्थिती कोणती? ती अशी : काम करून आपला उदर निर्वाह चालविण्याचा हक्क; समान कामासाठी स्त्रियांना समान पगार; शिक्षण व वैद्यकीय साहाय्य मिळण्याचा हक्क प्रत्येकाला मिळाला पाहिजे. सोविएत दर्जाने पाहिल्यास या सनदेतील तरतुदी किमान आहेत. मोफत वैद्यकीय सेवेबद्दल त्यात काहीच म्हटलेले नाही; माध्यमिक शिक्षण मोफत देण्याची सवलत "क्रमशः लागू करावी" एवढेच तिच्यात म्हटले आहे. सेवानिवृत्तीच्या वयाचा वगैरे अनेक निर्देश तिच्यात नाहीत. ह्या सनदांचा मसुदा तयार करण्याचा कामात विकसनशील देशांसकट अनेक देशांनी भाग घेतला होता. ह्या परिस्थितिने त्यांच्या आशयावर ठसा उमटवून ठेवला आहे. विकसनशील देशांना अनुसरता येतील अशी मार्गदर्शक तत्त्वे त्यांनी ग्रथित करावयाची होती.

पाश्चात्य देशातील पुरोगामी बुद्धीजीवी वर्ग सामाजिक व आर्थिक हक्कांचे निर्णायक महत्त्व अर्थातच जाणतो. १९४६ सालीच, अमेरिकन अॅकॅडमी ऑफ पोलीटिकल अॅन्ड सोशल सायन्स या संस्थेने आवश्यक मानवी हक्कांबाबतचे एक प्रकाशन प्रसिद्ध केले. या पुस्तकाचा संपादकांनी नमूद केले आहे की काम करण्याचा, शिक्षणाचा, सत्वयुक्त पोषणाचा, घर व सामाजिक देखभालीचा हक्क हे औद्योगिक क्रांतीमुळे मानवी स्वातंत्र्याची

सर्वोच्च आवश्यकता होऊन बसले आहेत. हे हक्क नसते तर भाषण-स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य वगैरे पारंपारिक स्वातंत्र्याचे हक्क निरर्थक ठरतील किंवा पूर्णपणे नष्टच होतील. हे सांगून त्यांनी अगदी योग्य तेच केले, पण अमेरिकन काँग्रेसचा अंतिम निर्णय असा आहे की सामाजिक-आर्थिक हक्कांचे स्वरूप समाजसत्तावादी आहे आणि त्यायोगे पडणाऱ्या जबादाऱ्या कोणतेहि सरकार पार पाडू शकणार नाही.

काँग्रेस-सदस्यांच्या ह्या विधानात एक चूक आहे. "कोणतेहि भांडवलदारी सरकार" असे त्यांनी म्हणायला हवे होते. ते अधिक प्रामाणिकपणाचे झाले असते.

ह्या हक्कांशिवाय स्वातंत्र्य आणि लोकशाही हे केवळ पोकळ ठरतील अशा ह्या हक्कांची हमी समाजसत्तावादी समाज देतो. त्यापैकी अत्यंत महत्वाचे पुढीलप्रमाणे :-

- काम करण्याचा हक्क – यात कारागरी किंवा व्यवसाय निवडण्याचा व नोकरीची हमी मिळण्याचा हक्क समाविष्ट आहे;
- आरोग्य-संरक्षणाचा हक्क;
- म्हातारपणाच्या देखभालीचा हक्क;
- घर मिळण्याचा हक्क;
- शिक्षण घेण्याचा हक्क;
- सांस्कृतिक सुविधा उपभोगण्याचा हक्क.

ह्या आणि अन्य हक्कांची हमी देऊन समाजसत्तावादी समाज प्रत्येकाच्या विकासाची व त्याच्या अगर तिच्या अंगातील बुद्धीमत्ता व कुवती यांचा वापर समाजाच्या कल्याणासाठी आणि व्यक्तींच्या हिताला पोषक अशा रीतीने करण्याची शाश्वती निर्माण करतो. त्यामुळे लोकांच्या मनात आपल्या समाजाविषयी, उद्याच्या भवितव्याविषयी विश्वास निर्माण होतो; आणि त्यांची वैयक्तिक अस्मितेची जाणीव वरच्या पातळीवर जाते.

काम करण्याचा हक्क

'नेशन्स बिझनेस' या अमेरिकन नियतकालिकाने संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेचे एके काळचे कायम प्रतिनिधी, हारवर्डचे प्राध्यापक, डॅनियल पी. मोयर्नीहान यांना विचारले की "आपल्या मते ज्याचे समर्थन करणे अत्यंत कठीण आहे अशी भांडवलशाहीची दुर्बलता कोणती ?" तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "बेकारी ही अमेरिकन भांडवलशाहीची सर्वात मोठी उणीव होय."

बेकारी ही फक्त अमेरिकेचीच उणीव नसून समग्र भांडवशाहीची उणीव आहे एवढी भर ह्या विधानात घातली पाहिजे.

अधिकृत आकडेवारीनुसार १९८० साली सुरू झालेल्या दशकाच्या प्रारंभी विकसित देशांतील बेकारांची संख्या १ कोटी ७० लाख ते १ कोटी ८० लाख होती. पण त्या त्या देशातील कामगार संघटनांनी जाहीर केलेले खरे आकडे पाहिल्यास परिस्थिती अधिकच चिंताजनक होती. बारा देशांत (अमेरिका, जपान, आणि सामायिक बाजारपेठांतील देश) बेकारांची संख्या २ कोटी ५० लक्ष (अमेरिकेत १ कोटी २० लक्ष, जपानमध्ये ३० लक्ष व युरोपीय सामायिक बाजारपेठांतील देशात एक कोटी) होती.

बेकारांचे हे लष्कर बरीच वर्षे अस्तित्वात आहे, आणि लोक त्यात व त्याबाहेर एकाहून अधिक वेळा असतात. **रबोची क्लास ई सव्रमेन्नी मीर** (कामगार वर्ग आणि आधुनिक जग) ह्या सोविएत नियतकालिकाने १९७५ च्या सुरुवातीला असा अंदाज दिला होता की 'फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी', म्हणजे पश्चिम जर्मनीतील बेकारांची संख्या विविध कालखंडात १ कोटी किंवा रोजगार मिळवणाऱ्या लोकसंख्येच्या चाळीस टक्के एवढी होती. गेल्या पाच वर्षात अमेरिकेत अंदाजे २ कोटी ४० लाख ते २ कोटी ६० लाख लोक वर्षातून किमान एकदा तरी आपली नोकरी गमावतात. हा आकडा ब्रिटनमध्ये ३० लाखाहून अधिक आहे. शिवाय, उद्योगविनिमय कचेरीबाहेरील रांगेत थांबण्याचा काळ वाढतो, आणि "गरजेहून अधिक लोकांचे प्रमाण' वाढते याचाच अर्थ अनेक लोकांना बेकारभत्ता वगैरे फायदे मिळत नाहीत.

ह्या लोकांच्या दृष्टीने विचार करता व्यक्तीचा विकास किंवा मानवी इभ्रत वगैरेबद्दलचे बोलणे अर्थहीन ठरते.

बेकारीमुळे भीतीची भावना निर्माण होते; व्यक्तीच्या जीवनात झालेला तो एक विलक्षण बदल असतो. त्यामुळे त्याची अवहेलना होते, तो हक्क गमावून बसतो व त्याची प्रकृतीही खालावते. हा एक महाभयंकर सामाजिक आजार आहे.

काम करण्याचा हक्क ह्या सर्वात महत्त्वाच्या हक्काची हमी भांडवलदारी जग देऊ शकत नाही, तर "मानवी हक्कांचे" तुणतुणे वाजविण्याचा भांडवलदारी प्रचारयंत्रणेला काय हक्क पोचतो?

सोविएत कम्युनिस्ट पक्षाने आखलेला औद्योगिकीकरणाचा कार्यक्रम, आर्थिक विकासाचे व आर्थिक नियोजनाचे प्रचंड प्रमाण यांच्यामुळे देश आर्थिक संकटातून व मंदीच्या संकटातून मुक्त झाला; आणि बेकारी नष्ट झाली. "पाहिजेत" च्या जाहिराती गिरण्यांच्या फाटकावर सर्रास दिसतात व वर्तमानपत्रात छापल्या जातात. "काम करण्याचा हक्क" ही संकल्पना सोविएत संघटनेच्या नव्या घटनेनुसार आणखी प्रगाढ

करण्यात आलेली आहे, आणि कसब किंवा व्यवसाय निवडण्याचा हक्क आता तीत भरीला घालण्यात आलेला आहे.

सोविएत संघराज्यात काम करण्याच्या हक्कातच आपले कसब सुधारण्याची किंवा नवे कसब शिकण्याची संधीदेखील समाविष्ट आहे. त्यासाठी लागणारा आवश्यक तो सर्व खर्च सरकार सोसते. १४५० प्रकारचे कसब शिकविणाऱ्या ७००० हून अधिक धंदे–शिक्षणाच्या शाळा देशात आहेत.

धंदे–शिक्षणाच्या शाळेतून, माध्यमिक किंवा विशेष माध्यमिक विद्यालयातून किंवा विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडलेला माणूस कधीही बेकार रहात नाही, आणि आमच्या देशात माणूस काम शोधत फिरत नाही, तर कामच माणसाचा शोध घेत येते, हे आता सोविएत जनतेच्या परिचयाचे होऊन बसले आहे.

आरोग्य संरक्षण

जगातील पहिल्या समाजसत्तावादी सरकारचे संस्थापक व्लादिमीर लेनिन यांनी गमतीने म्हटले होते की जनतेचे आरोग्य ही "सरकारी मालमत्ता" आहे. समाजसत्तावादी समाजात चांगले आरोग्य ही व्यक्तिगत चिंतेची आणि आनंदाचीच बाब असते, असे नाही – तर ती सार्वजनिक संपत्ती देखील असते. गेल्या सहा दशकात सार्वजनिक आरोग्य व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने खरोखरच प्रचंड कार्य करण्यात आले असून आता ते सोविएत जीवन-पद्धतीचे एक प्रमुख वैशिष्टच बनले आहे.

देशातील डॉक्टरांची संख्या कसकशी वाढत गेली, ते दाखविणारे हे काही आकडे पाहा : १९१३–२८०००; १९४०–१५५,०००; १९८०–९९५,६००. हे आकडे मोठे आहेत, की लहान? ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आणखी इतर काही आकडे पाहू. सबंध जगातील डॉक्टरांची संख्या २७ लक्षाहून अधिक आहे. त्यांच्या पैकी एकतृतीयांश सोविएत संघराज्यात काम करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार वैद्यकीय सेवेचे कमाल प्रमाण लोकसंख्येच्या दर १००,००० लोकांमागे २८० डॉक्टर असे आहे. सोविएत संघराज्यात हे प्रमाण खूपच अधिक आहे: आमच्याकडे दर १००,००० लोकांमागे ३७२ डॉक्टरआहेत. फक्त काही भांडवलदारी देश प्रमाणित संख्येपाशी पोचतात, तर सोविएत संघराज्यातील १५ संघ–प्रजासत्ताकांपैकी प्रत्येकाने अनेक भांडवलदारी देशांना मागे टाकले आहे.

डॉक्टरांच्या संख्येतील वाढीबरोबरच वैद्यकीय सेवेचा भौतिक पायाहि भक्कम करण्यात आलेला आहे: नवी रुग्णालये, सार्वत्रिक व विशेष रोगांसाठी बाह्यरुग्ण

चिकित्सालये, बहुउद्देशीय चिकित्सालये, आणि आरोग्यधामे बांधण्यात आलेली आहेत; रुग्णवाहिकांचे जाळे उभारण्यात आलेले आहे वगैरे.

सोविएत आरोग्य व्यवस्थेची दोन खास वैशिष्टये आहेत. पहिले म्हणजे ती मोफत आहे आणि प्रत्येकाला मिळू शकते. कोणाहि सोविएत नागरिकाला विचारा : "प्रथमोपचार तातडीने बोलवण्यासाठी, पोटाची शस्त्रक्रिया करण्यासाठी किंवा डोळयावर शस्त्रक्रिया करून देण्यासाठी किती खर्च येतो ?" तुम्हाला एकच उत्तर मिळेल : "मला माहित नाही. याचा कधी विचारच मनात आला नाही."

वोरोनेझ प्रदेशातील सामुदायिक किसान अॅना गोर्बाचेवा जेव्हा आपल्या खेडयातील बहुउद्देशीय चिकित्सालयात गेली, तेव्हा तिच्याच शब्दात सांगायचे झाल्यास "संपूर्ण वैद्यक शास्त्रातून" आपल्याला प्रवास करावा लागेल, हे तिच्या ध्यानीमनीहि नव्हते. खेडयातून ती जिल्हयाच्या रुग्णालयात, मग प्रादेशिक रुग्णालयात आणि शेवटी मॉस्कोतील रुग्णालयात जाऊन आली; या दरम्यान, डझनावारी विशेषज्ञांकडून सल्ला, अत्यंत गुंतागुंतीच्या चाचण्या व तपासण्या, आणि एक शस्त्रक्रिया* पार पडली. या औषधोपचाराला किती खर्च आला, असे एका पत्र-प्रतिनिधीने अॅनाला विचारले. अॅनाने जिल्हयाच्या ठिकाणी जायचे बस भाडे व मॉस्कोला रेल्वेने जायचे भाडे यांचा हिशोब करायला सुरुवात केली. आपल्याला वैद्यकीय खर्चाविषयी विचारताहेत, हे तिच्या ध्यानातही आले नाही. तिन्ही रुग्णालयातील हिशोबनीसांनी अंदाज केला की, अॅनाला दिलेल्या वैद्यकीय सेवेपोटी सरकारला १,५०० रुबल खर्च आला. ही काही थोडी थोडकी रक्कम नव्हे. बरे, यात तात्पुरत्या अपंगत्वासाठी दिला जाणारा भत्ता धरलेला नाहीच; तो जवळ जवळ तिच्या सरासरी मासिक वेतनाएवढाच होता. ती आजारी होती, त्या १८ महिन्यात रोसिया सामुदायिक शेताने तो तिला दिला. (जाता जाता तुलनेसाठी पहा — **यू. एस. न्यूज अॅण्ड वर्ल्ड रिपोर्ट** या अमेरिकन नियतकालिकात जोसेफ व्हाईट यांनी लिहिले आहे : "अत्यंत चिंताजनक स्वरूपाच्या शस्त्रक्रियेसाठी मी नुकताच दोन आठवडे रुग्णालयात राहून आलो, आणि आता त्याचे पैसे भरण्यासाठी धडपडतो आहे. मला किती खर्च आला, याच्यावर तुमचा विश्वास बसणार नाही. माझा तुम्हाला सल्ला आहे : अमेरिकेत आजारी पडू नका !"

सोविएत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे दुसरे खास वैशिष्टय म्हणजे रोगप्रतिबंधक किंवा रोगाच्या प्रारंभिक अवस्थेत तो शोधून काढण्याची उपाययोजना हे होय. दरवर्षी १० कोटी लोकांची — देशातील लोकसंख्येच्या दोन पंचमांश जणांची सर्वांगीण वैद्यकीय तपासणी करण्यात येते. तथाकथित धोक्याचा घटक असलेल्या

---

* १०० अमेरिकन डॉलर=७१ रुबल ५० केपेक (१९८२ च्या मध्याला असलेला विनिमयाच्या दरानुसार)

प्रत्येकाची बाह्यरुग्ण चिकित्सालयात नोंद केली जाते आणि त्याची डॉक्टरांकडून नियमितपणे तपासणी करण्यात येते. याचाच अर्थ असा की, रोग बरा करण्याची किंवा त्याच्या वाढीला अटकाव करण्याची वैद्यकशास्त्राला अधिक संधी मिळते.

शिक्षणाचा हक्क

गेल्या १५–२० वर्षांत भांडवलदारी देशात शिक्षण-क्षेत्रात फार तीव्र असा राजकीय आणि वर्गलढा पेटलेला आहे. शाळा आणि उच्चतर शिक्षण संस्थेचे लोकशाहीकरण करण्याच्या अनेक योजनांवर पक्षीय अधिवेशनात, शिक्षक-परिषदात, कामगार संघटनांच्या अधिवेशनात व संसदेच्या सत्रात चर्चा झालेली आहे.

प्रत्येक भांडवलदारी देशाची शिक्षण-क्षेत्रातील असामानतेची स्वतःची अशी यंत्रणा आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेतील शालेय व्यवस्था अशा रीतीने संघटित करण्यात आलेली आहे की, वांशिक भेदाखेरीज, रहाण्याच्या जागेनुसार, आर्थिक भेदाभेदही केला जातो. अमेरिकेतील शाळांचा आर्थिक भार मालमत्तेवरील स्थानिक करातून सोसला जातो, याचाच अर्थ असा की, गरिबांच्या जिल्ह्यातील शाळांच्या दर्जाहि कमी असतो आणि साधन सामुग्रीहि बेताचीच मिळते. तिथल्या शिक्षकांना वेतनहि कमी मिळते, त्यामुळे त्यांचा शैक्षणिक दर्जा खालचा असतो; आणि एकूणच विद्यार्थ्यांची सांस्कृतिक पातळी खालच्या दर्जाची असते.

इतर अनेक भांडवलदारी देशात खाजगी शाळांच्या व्यतिरिक्त प्राथमिक व अर्धेमुर्धे माध्यमिक शिक्षण मोफत देण्याची व्यवस्था असते. अशी व्यवस्था अस्तित्वात असण्याची तीन कारणे देता येतील. पहिले असे की, वैज्ञानिक व तंत्रविषयक क्रांतीची काही एक गरज असते; कसबी कामगारांशिवाय आधुनिक उत्पादन व आधुनिक तंत्रशास्त्र यांचा विचार देखील करता येणार नाही. दुसरे कारण म्हणजे शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था बदलावी म्हणून कामगारवर्गाने चालविलेला लढा आणि लोकशाहीवादी शक्तींनी आणलेले दडपण याचा परिणाम होऊन सत्ताधारी वर्गाला काही सवलती देणे भाग पडले, आणि तिसरे कारण म्हणजे, सोविएत संघराज्यांचे उदाहरण पाहून सत्ताधारी वर्गांना कृती करावीच लागली. याचे कारण असे की, सोविएत शिक्षणपद्धती विषयी पाश्चात्य देशात खूपच लिहिले गेले; आणि कादंबरीकार चार्लस पी. स्नो यांच्यासारख्या अत्यंत आदरणीय लोकांकडून ते लिहिले गेले.

पण, वैज्ञानिक व तंत्रविषयक क्रांतीचे महत्त्व मान्य करुनही, आणि शिक्षणव्यवस्थेतील काही सुधारणांना मान्यता देऊनहि सत्तारुढ वर्ग शिक्षणाच्या आशयावरील

आपले नियंत्रण ढळू देत नाहीत, शक्य तें सर्व शैक्षणिक निर्बंध शाबूत ठेवतात. उदाहरणार्थ, स्वीडनमधील सात विद्यार्थ्यांमागे फक्त एकच कामगारवर्गात जन्मलेला असतो, हा काही योगायोग नव्हे. ब्रिटिश वृत्तपत्रांचा असा अंदाज आहे की, विश्वविद्यालयाने शिक्षण घेण्याची शक्यता "मध्यम वर्गातील" मुला-मुलींना १ : १; बाबू म्हटल्या जाणाऱ्या कामगारात १ : ३; कसबी कामगारांच्या मुलांना १ : ६ आणि बिन-कसबी कामगारांच्या मुलांना १:१० आहे. सारांश, शिक्षणातही सामाजिक थरांची उतरती शिडी कायम ठेवण्यात आलेली असते.

सोविएत शिक्षण पद्धतीने आपल्यापुढे वेगळीच उद्दिष्टे ठेवली आहेत. आमच्या देशात वैज्ञानिक व तंत्रविषयक क्रांती गिरण्या आणि कचेऱ्यातील कर्मचाऱ्यांकडून व्यावसायिक दर्जाबाबत त्याच अपेक्षा ठेवते, हे स्वाभाविकच होय. ह्या बाबी हिशोबात घेतल्याखेरीज सोविएत शिक्षण व्यवस्थेचे भागण्यासारखेच नाही. शालेय पाठ्यपुस्तकाचे आणि अभ्यासकांचे नियमितपणे नूतनीकरण होत असते. परंतु, सोविएत शिक्षण व्यवस्थेपुढील उद्दिष्टे कधीही उपयुक्ततावादातून ठरविली जात नाहीत.

समाजसत्तावाद हा विधायक प्रयत्न काही व्यक्तींचा किंवा समाजातील वेगळ्या स्तराचा नव्हे, तर समग्र लोकांचा आहे. गुंतागुंतीची यंत्रसामुग्री हाताळण्यासच केवळ समर्थ असे नव्हे, तर कारखान्याचे सामुदायिक कार्यगटाचे प्रश्न सोडविण्यातही समर्थ आणि व्यवस्थापनात सहभागी होण्यास लायक अशा नागरिकांनी सामाजिक दृष्ट्या क्रियाशील व्हावे, अशी समाजसत्तावादी समाजाची अपेक्षा आहे. व्यक्तीची सामाजिक हालचाल बऱ्हंशी तिच्या शैक्षणिक दर्जावर अवलंबून असते.

आमच्या शिक्षण पद्धतीचे आणखी एक मूलभूत वैशिष्ट्य म्हणजे सर्व पातळ्यांवर असलेले तिचे लोकशाहीवादी स्वरूप, हे होय. अगदी प्राथमिक शाळेपासून ते थेट विद्यापीठापर्यंत आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमातही.

सोविएत संघराज्यातील सर्व नागरिकांच्या शिक्षण घेण्याच्या हक्कांची शाश्वती पुढील घटनात्मक तरतुदींमुळे निर्माण होते.

— सर्व प्रकारच्या शिक्षणाची मोफत तरतूद;
— सक्तीच्या माध्यमिक शिक्षणाची प्रस्थापना;
— धंदेवाईक विशेष माध्यमिक व उच्चतर शिक्षणाचा व्यापक विकास;
— विद्यालयाबाहेरून घ्यावयाच्या व सायंकालीन अभ्यासक्रमाचा विकास;
— विद्यार्थ्यांसाठी सरकारी शिष्यवृत्त्यांची तरतूद.
— (सर्व संघ–प्रजासत्ताकात) देशी भाषेतून शिक्षण दिले जात असेल त्या शाळेत जाण्याची संधी;

— स्वाध्यायासाठी सवलतींची तरतूद.

— कामात खंड न पाडता अभ्यास करणारांसाठी सवलतींची पद्धत. (आठवड्यातून एक दिवस भरपगारी रजा, परीक्षांसाठी जादा पगारी रजा वगैरे).

अमेरिकेतील आणि सोविएत संघराज्यातील शालेय पद्धतींचे निरीक्षण केल्यानंतर अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष ह्यूबर्ट हंफरे यांनी कबूल केले की, कोट्यवधी रशियन मुलांना शिक्षणाच्या व बौद्धिक विकासाच्या ज्या संधी उपलब्ध आहेत, त्या अमेरिकेत फारच थोड्या जणांना उपभोगायला मिळतात, ही गोष्ट अगदी स्पष्ट झाली आहे.

समाजसत्तावादी समाजातील वातावरणच मुळी असे असते की, त्यात लोकांना आपला शैक्षणिक दर्जा उंचवण्यास प्रोत्साहन मिळते. कष्टकरी जनता आणि शिक्षण यांच्या दरम्यान सोविएत समाज अडथळे उभे करीत नाही, उलट प्रत्येक तरूण कामगाराला सायंकाळच्या शाळेत, विशेष माध्यमिक शाळेत किंवा उच्चतर शिक्षण देणाऱ्या संस्थेत जायला प्रोत्साहन देतो; आणि नैतिक व भौतिकदृष्ट्या त्याला प्रेरणा द्यायचा प्रयत्न करतो.

सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रचंड कार्य केल्यानंतर सोविएत सरकारने सार्वत्रिक सक्तीचे माध्यमिक शिक्षण लागू केले.

समाजसत्तावादी समाज हा सुशिक्षित लोकांचा समाज आहे, असे म्हणता येईल. शिवाय, उच्चतर किंवा माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण सातत्याने वाढते आहे. सोविएत कालखंडात ते कसे वाढले, त्याचे हे आकडे पहा—१९३९–१ कोटी ५९ लक्ष; १९५९–५ कोटी ८७ लक्ष; १९७०–९ कोटी ५० लक्ष; आणि १९८१–१४ कोटी ६० लक्ष. रोजगार मिळविणाऱ्यांपैकी दोनतृतीयांशाहून अधिक लोकांनी किमान माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे. लोकसंख्येच्या दर १०,००० मागे विद्यार्थ्यांच्या प्रमाणाच्या बाबतीत सर्व संघ–प्रजासत्ताके पश्चिम युरोपातील प्रमुख राष्ट्रांच्या पुढे आहेत. या वास्तव घटनांमागे सर्वंकष संघटनात्मक कार्य आहे. इतकेच नव्हे, तर सार्वजनिक शिक्षणाच्या विकासासाठी सरकारने गुंतविलेले अब्जावधी रूबलही आहेत.

भौतिक फायदे वाटण्याचे समाजसत्तावादी तत्त्व

जसे लोकशाहीशिवाय समाजसत्तावादाची कल्पना करणेदेखील अशक्य आहे, तसेच लोकांच्या भौतिक स्वास्थ्यात सातत्याने होणाऱ्या वाढीशिवायहि त्याची कल्पना करणे अशक्य आहे.

भूतकाळात जेव्हा अवजड उद्योग उभारणे हा देशाच्या जीवन–मरणाचा प्रश्न होता, तेव्हा सोविएत लोकांनी अनेकदा स्वतःसाठी किमान गरजादेखील नाकारलेल्या आहेत. इल्या एऱ्हेनबुर्ग * यांनी नमूद केले आहे की, सोविएत उद्योग-धंद्यांचे पहिले वहिले पायाचे खड्डे हेच फॅसिझमविरोधी लढ्याचे पहिले खंदक होते. परंतु, त्या कालाखंडातही लोकांना जाणवत होते की, नवी व्यवस्था आपल्या स्वास्थ्याची काळजी घेते आहे आणि चिंता करते आहे–ह्याचा विचार आधी करण्यात आला आहे. (बेकारीचे उच्चाटन, आरोग्य संरक्षणाचा व शिक्षणाचा विकास वगैरे). प्राप्ती वाढत गेली; कामाचा दिवस पद्धतशीरपणे लहान होत गेला, घरबांधणीची परिस्थिती व दररोजच्या सेवा–सुविधा सुधारत गेल्या.

जसजशी देशाची आर्थिक सुप्तशक्ती वाढत गेली, तसतसा सामाजिक उपभोग्य निधीहि वाढत गेला, ही विशेष महत्त्वाची बाब होय. हा निधी मोफत शिक्षण, वैद्यकीय साहाय्य, भत्ते देणे, शिष्यवृत्त्या, निवृत्तिवेतन आणि वार्षिक रजा, पूर्वप्राथमिक शिक्षण-संस्थांची देखभाल वगैरेंच्या विकासासाठी समाजसत्तावादी सरकार वाटून देत असते. या निधीतून दरडोई मिळणारे भत्ते व फायदे १९४० साली २४ रूबल, १९६५ साली १८२ रूबल, १९७५ साली ३५४ रूबल आणि १९८० साली ४३८ रूबल होते.

सामाजिक उपभोग्य निधीचे महत्त्व कशात आहे?

समाजसत्तावादी समाजात समान कामाला समान वेतन मिळते, पण लोकांची प्राप्ती समान नसते; कुणाची शैक्षणिक गुणवत्ता इतरांपेक्षा अधिक चांगली असते; काम करण्याची कुवत प्रत्येकाची वेगळी असते; कुटुंबातील व्यक्तींची संख्या कमी जास्त असते; आणि याचा परिणाम म्हणून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीमागची सरासरी प्राप्ती वेगवेगळी असते.

परंतु समाजसत्तावादी व्यवस्थेत धारणा अशी असते की, सर्वांना विश्रांतीची संधी, फुरसतीचा वेळ, शिक्षण, वैद्यकीय सहाय्य, निवृत्तीवेतन इत्यादी गोष्टी सारख्या मिळाव्यात. अशा संधी समाजसत्तावाद क्रमशः संथपणे निर्माण करतो. या प्रक्रियेत सामाजिक उपभोग्य निधी असाधारण महत्त्वाची भूमिका बजावतो.

कधी कधी मला प्रश्न विचारण्यात येतो की, उपभोग्य निधीसाठी रकमा बाजूला काढून ठेवण्याऐवजी वेतन वाढविणे अधिक चांगले नाही का ? नाही,

---

* इल्या एऱ्हेनबुर्ग (१८९१–१९६७), सोविएत लेखक आणि सार्वजनिक कार्यकर्ता, **ज्युलिओ जुरेनितो, पॅरिसचा पाडाव**, आणि इतर कादंबऱ्यांचे; आणि फॅसिस्टविरोधी प्रसिद्धीपटू, **युद्ध १९४१–४५** या ग्रंथाचे कर्ते.

निश्चितच नाही. खरीखुरी सामाजिक समता निर्माण व्हावी म्हणून आपण झटत आहोत. जर सामाजिक संपत्तीचा काही अंश मोफत वाटण्याची पद्धत आपण रद्द केली, तर जास्त प्राप्ती असलेले लोक, कुटुंबात न कमावणारा, कोणीही नसलेली कुटुंबे इतरांपेक्षा जास्त फायद्यांचा उपभोग घेतील. त्यामुळे समता निर्माण होणार नाही, तर सामाजिक विरोध तीव्र तर होतील – आणि हेच तर आपण सर्व भांडवलदारी देशात पहात आहोत.

या प्रकरणात, सोविएत संघराज्यात सामाजिक सुरक्षिततेची अनेक खास वैशिष्टये मला वाचकांच्या नजरेस आणून द्यायची आहेत; त्यायोगेच भांडवलदारी जीवन–पद्धतीहून समाजसत्तावादी जीवन–पद्धती वेगळी उठून दिसते.

निवृत्ती–वेतने

सेवानिवृत्ती वेतनाची सोविएत व्यवस्था म्हणजे समाजसत्तावादाची सर्वात मोठी यशःसिद्धी होय. म्हातारपणी सरकार आपली काळजी घेईल, हे सोविएत कामगाराला ठाऊक असते. देशाची आर्थिक ताकद वाढत जाते, तसतसे निवृत्ती–वेतनाचे मानतही वाढत जाते. हे त्याला ठाऊक आहे. उदाहरणार्थ, १०व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (१९७६–८०) गिरण्या आणि कचेऱ्यातील कर्मचाऱ्यांच्या काही गटांचे व सामुदायिक शेतकऱ्यांचे निवृत्तीवेतन वाढविण्यात आले. गिरण्या व कचेऱ्यातील कर्मचारी, आणि सामुदायिक शेतकरी यांच्यासाठी निवृत्तीवेतन एकाच पद्धतीने ठरविण्यात येते. युद्धात अपंग व अधू झालेल्या कामगारांसाठी असलेली सेवानिवृत्ती वेतनाची व्यवस्था सुधारण्यासाठी बऱ्याच मोठ्या रकमांची तरतूद करण्यात आली.

सोविएत निवृत्तीवेतन व्यवस्थेची प्रमुख वैशिष्टये कोणती आहेत ? भांडवलदारी व्यवस्थेहून ती कोणत्या बाबतीत वेगळी आहेत ?

पहिली गोष्ट म्हणजे (पाश्चात्य देशांच्या तुलनेने) निवृत्तीचे वय कमी आहे : स्त्रियांसाठी ५५ आणि पुरुषांसाठी ६०. याशिवाय, कामगारांच्या काही गटांसाठी (उदाहरणार्थ, ज्या उद्योगधंद्यातील उत्पादनाची परिस्थिती घातक समजली जाते अशांसाठी किंवा मोठ्या कुटुंबातील मातांसाठी) निवृत्तीचे वय त्याहूनहि कमी असते. भांडवलदारी देशात, अत्यंत प्रगत अशा भांडवलदारी देशातसुद्धा निवृत्तीचे वय बरेच जास्त आहे. (स्वाभाविकपणेच, जेथे निवृत्तिवेतन व्यवस्था आहे, अशाच देशांबद्दल आम्ही बोलतो आहोत.)

दुसरे असे की, निवृत्तीवेतन सरकार देते. आपल्याला मिळणाऱ्या भावी निवृत्तिवेतनासाठी औद्योगिक कामगार किंवा कचेऱ्यातील कर्मचारी कोणतीहि वर्गणी भरीत नाही.

तिसरे असे की, निवृत्तिवेतन प्रत्येकाच्या आवाक्यात असते, देशात बेकारी नसल्यामुळे प्रत्येकाला नोकरी मिळते आणि आवश्यक तेवढी वर्षे काम केल्यानंतर प्रत्येकाला म्हातारपणी गुजराण होण्याचा हक्क लाभतो.

चौथे म्हणजे, निवृत्त कामगार कर्मचाऱ्यांना अनेक खास सवलती आहेत. विशेष म्हणजे, ते कोणतेही कर देत नाहीत. भांडवलदारी देशातील निवृत्त मंडळी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रकारचे कर भरतात.

पाचवी गोष्ट म्हणजे, निवृत्तीच्या वयाला पोचल्यावर किंवा निवृत्तिवेतन मिळू लागल्यावर माणसाने काम करणे बंदच केले पाहिजे, असे नाही. "निवृत्तीवेतन अधिक वेतन" हे सूत्र सोविएत निवृत्तिदारांना चांगले ठाऊक आहे. निवृत्त झालेला कर्मचारी काम करू शकतो आणि आपल्या निवृत्तिवेतनाव्यतिरिक्त पगाराची पूर्ण (जवळ जवळ सर्व गटातील कामगारांना) किंवा अंशतः रक्कम मिळवू शकतो.

निवृत्तिदाराला काम करणे चालू ठेवणे म्हणजे केवळ आणखी पैसे कमावणे एवढेच नसते, तर समाजाला अजून आपली गरज आहे, लोकांसाठी आपण अजूनही उपयुक्त आहोत, असे त्याला वाटते. त्यामुळे त्याची ताकद वाढते, प्रकृती सुधारते, आणि त्याचे आयुर्मानही काही वर्षांनी वाढते, असे अनेक सोविएत कारखान्यात संशोधन केल्यावर वैज्ञानिक विशेषज्ञांना आढळून आले आहे.

सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या २६ व्या काँग्रेसने मंजूर केलेल्या कार्यक्रमानुसार १९८१ साली म्हातारपणचे, अपंगत्वाचे आणि कुटुंबातील प्रमुखाचे निधन झाल्यास मिळणारे निवृत्तिवेतन आणखी वाढविण्यात आले. सबंध देशातील निवृत्तीवेतनात पद्धतशीर वाढ करण्यात आल्याने निवृत्तिदारांच्या राहणीच्या दर्जात सुधारणा होते.

किंमतींचे स्थैर्य

१९८१–१९८५ या काळात सोविएत संघराज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि १९९० मध्ये संपणाऱ्या कालखंडासाठीची दिशा सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या २६व्या काँग्रेसने मंजूर केली; या बाबतीतील पक्षाचे धोरण पुढीलप्रमाणे ग्रथित करण्यात आले आहे: "रोजचे खाद्यपदार्थ व उत्पादित माल यांच्या सरकारी किंमतींचे स्थैर्य टिकविण्याची हमी देणारे धोरण सातत्याने अवलंबिणे."

निवडणूक मोहिमातून दिल्या जाणाऱ्या त्यांच्या सगळ्या अतिउदार आश्वासनांतहि विशेषतः अमेरिकेतील भांडवलदारी राजकारणी मंडळी अशा धोरणाचे आश्वासन देऊ शकत नाहीत. भांडवलदारी जीवनपद्धती म्हणजे चलनफुगवटा आणि प्रत्येक वस्तूच्या

कमतीत सतत वाढ. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिराल्ड फोर्ड एकदा म्हणाले होते : चलन–फुगवटा–होय, चलनफुगवटा–कम्युनिझम् नव्हे, हाच आपला शत्रू नंबर एक आहे.

या पार्श्वभूमीवर सोविएत संघराज्यातील चित्र अगदी वेगळेच दिसून येते. एकदा **मॉस्को न्यूज** या वृत्तपत्राला एका ऑस्ट्रेलियन वाचकाचे फार उद्बोधक पत्र आले. १९६८ साली त्याने मॉस्कोला भेट दिली होती, त्यावेळी अन्नपदार्थांच्या किमती आणि शहरातील वहातुकीचे दर रोजनिशीत नोंदवून ठेवले हाते. १९८० साली, ऑलिम्पिक खेळांच्या दिवसात त्यांनी परत मॉस्कोला भेट दिली, तेव्हा आपली ती रोजनिशी बरोबर आणली होती. मग त्यांना काय आढळून आले? किमती त्याच होत्या. त्यांनी लिहिले आहे : मी आश्चर्यचकित झालो. जमिनीखालच्या रेल्वेचे भाडे कधी ठरविण्यात आले ते मॉस्कोवासियाला विचारा–तो सांगू शकणार नाही; कोणालाच आठवत नाही.

एकीकडे सोविएत जनतेची रोकड प्राप्ती सातत्याने वाढत असतानाच बहुतांश वस्तु आणि सेवा यांच्या किमती अनेक वर्षेपर्यंत त्याच राहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, मांस, दूधदुभत्याचे पदार्थ यांच्या किमती १९६२ पासून वाढविण्यात आलेल्या नाहीत. तर पाव, धान्ये, वनस्पती तेल, साखर आणि इतर अन्नपदार्थांच्या किमती १९५५ पासून त्याच आहेत. मध्यवर्ती उष्णतानिर्मिती, दूरध्वनीचे आणि शहरातील वाहतुकीचे दर १९४८ पासून बदलले नाहीत. १९२८ साली जे भाडे होते, तेच आजहि आहे आणि उपयुक्त सेवांसाठी कामगार कुटुंबाला सरासरीने प्राप्तीच्या ३ ते ५ टक्के एवढी रक्कम द्यावी लागते.

उत्पादनाची बदलणारी परिस्थिती, कच्चा माल काढून घेण्यावर होणाऱ्या खर्चातील वाढ, सुप्तशक्तींचा व काही प्रकारच्या मालाचा समंजस वापर होण्याची हमी निर्माण करण्याची गरज, यांच्यामुळे किमतीत काही दुरुस्त्या करण्याची वस्तु-निष्ठ आवश्यकता निर्माण होते. म्हणूनच, गेल्या अडीच वर्षांच्या काळात शासनाला किरकोळ किमतीत काही फेरबदल करावे लागले : १९८१ सालच्या सप्टेंबरच्या मध्यास काही वस्तूंच्या (विविध सौंदर्यप्रसाधने, छोटी व मोठी घड्याळे, विजेवर चालणारी घरगुती उपकरणे, काही प्रकारचे कापड वगैरेंच्या) किमती १२ ते ३५ टक्क्यांनी उतरविण्यात आल्या तर फरचे कपडे, गालिचे, जडजवाहिर, मद्य, तंबाखू आणि सिगरेटी यांच्या किमती वाढविण्यात आल्या. त्याचप्रमाणे पेट्रोलच्या किमतीही वाढविण्यात आल्या. इंधनाचा वापर काटकसरीने व्हावा, म्हणून हे करण्यात आले. ज्या अनेक वस्तूंच्या किमती वाढविण्यात आल्या, त्यांचा संबंध जागतिक बाजारांतील सातत्याने होणाऱ्या चलन–फुगवट्याशी होता. मद्यार्क असलेली पेये व तंबाखू

सेवन प्रकृतीस अपायकारक असल्याने त्यांच्या उपभोगास पायबंद घालण्यासाठी त्यांच्या किंमती वाढविण्यात आल्या.

किंमती निश्चित करताना वस्तुच्या किंवा सेवेच्या फक्त उत्पादन–खर्चाचा विचार केला जात नाहीं, तर तिच्या सामाजिक महत्त्वाचाहि विचार करण्यात येतो. त्यामुळेच आमच्या देशात अनेक वस्तू निर्मिती–खर्चाच्याहि कमी दराने विकल्या जातात. सरकारी अनुदानातून तोटा भरून काढण्यात येतो. उदाहरणार्थ, मांस आणि दूध यांच्या उत्पन्नासाठी दिले जाणारे वार्षिक अनुदान २५ अब्ज रूबल एवढे असते; नागरी अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक वाहतूक यांच्या विकासासाठी व देखभालीसाठी दिले जाणारे वार्षिक अनुदान जवळजवळ ९ अब्ज रूबल एवढे असते.

प्रत्येक पंचवार्षिक योजनेबरोबर सोविएत संघराज्यात होणाऱ्या वेतन–वाढीमुळे खऱ्या प्राप्तीत वाढ होते व म्हणून उपभोगातहि वाढ होते. स्वाभाविकपणेच, या देशाची लोकसंख्या २७ कोटी असल्याने समग्र जनतेच्या रोकड प्राप्तीत एकाचवेळी वाढ करण्यात येत नाहीं; तर प्रथम, जे अति-उत्तरेकडे काम करतात, त्यांच्या प्राप्तीत वाढ करण्यात येते; नंतर शिक्षक व डॉक्टर, मग विद्यार्थी वगैरेंच्या. क्रमशः प्रत्येक पावलागणिक, हे संख्यात्मक बदल मग गुणात्मक बदल होतात. उदाहरणार्थ, गेल्या तीन दशकात वेतनात २.५ पटींनी वाढ झालेली आहे.

घरबांधणी

सोविएत कुटुंबाला रहायचा गाळा मोफत मिळतो. पाश्चात्य देशातील परिस्थितीचा विचार करता, घरभाडे हास्यास्पद वाटण्याएवढे कमी असते. आधीच सांगितल्याप्रमाणे, ते कुटुंबाच्या प्राप्तीच्या ३ ते ५ टक्क्यांएवढे असते. घरांची देखभाल करायला जेवढा खर्च येतो, त्यापैकी फक्त एकतृतीयांश त्यातून भागतो. बाकीचा खर्च सरकार करते.

सोविएत संघराज्यात घरभाडे कमी आणि स्थिर आहे, ही एक मोठीच सामाजिक यशःसिद्धी आहे–असे वर्णन परदेशातील प्रमुख राजकारणी आणि सार्वजनिक नेते करतात. ब्रिटनचे माजी पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी नमूद केले की, सोविएत संघराज्यात घरभाडे कमी आहे, हीच एक मोठी क्रांती आहे.

प्रत्येकाला घर मिळण्याचा हक्क आहे, याची हमी सोविएत संघराज्याच्या नव्या घटनेने घोषित केली आहे. भांडवलदारी जगातील एकाहि घटनेत या हक्काची तरतूद नाहीं. सोविएत संघराज्यात घर मिळण्याच्या हक्काची हमी मिळते, ती केवळ कमी

घरभाड्यामुळेच नव्हे, तर घरबांधणीचा व्यापक कार्यक्रम आणि घरांचे वाजवी वाटप यांच्यामुळे देखील मिळते. १० व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात घरबांधणीसाठी तरतूद केलेली रक्कम १०० अब्ज रूबल या विक्रमी आकड्यावर पोचली. बांधल्या जाणाऱ्या प्रत्येक १०० नव्या गाळ्यांपैकी ७४ सरकारी खर्चाने, ४ सामुदायिक शेतांच्या खर्चाने आणि २२ गाळ्यांना सरकारी कर्ज मिळत असल्याने लोकांच्या खर्चाने बांधले जातात. सहकारी किंवा वैयक्तिक बांधणाऱ्याला सरकारकडून किंवा सामुदायिक शेताकडून जवळजवळ बिन–व्याजी कर्ज मिळते (व्याजाच्या दर ०.५ टक्के एवढा आहे) आणि जमिनीचे तुकडे मोफत मिळतात.

विख्यात अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जॉन के. गालब्रेथ यांनी 'तास'च्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीत, घरासकट सर्व भौतिक प्रमुख फायदे वाटण्याच्या सोविएत धोरणाची जी प्रमुख वैशिष्टये आहेत, त्याचा जो आशय आहे, त्याबद्दल जी टीका–टिप्पणी केली आहे, ती खूपच बोलकी आहे : ते म्हणाले, सामाजातील अल्पसंख्य लोकांसाठी जीवनमानाच्या उच्च दर्जाची हमी देणारी अर्थव्यवस्था नियोजित करणे अवघड नाही. ते सरंजामशाही समाजात आणि रशियन साम्राज्यातहि करण्यात आले होते. बहुसंख्य लोकांना समाधानकारक जीवनमान मिळवून देणेही अवघड नाही. हे जेव्हा सर्वांसाठी करण्याचा प्रश्न येतो, तेव्हा ही समस्या अवघड होऊन बसते. मग, आवश्यक गोष्टी खरोखरच अतिप्रचंड स्वरूप धारण करतात.

सोविएत संघराज्यात सबंध लोकसंख्येच्या हिताच्या दृष्टीने सामाजिक प्रश्न नेमके सोडविण्यात येतात, ते असे. गेल्या १५ वर्षात १६ कोटी लोकांच्या घरांची स्थिती सुधारण्यात आली.

विश्रांती आणि फुरसदीचा वेळ

सोविएत संघराज्यात कामाचा आठवडा पाच दिवसांचा असून दोन दिवस कामाला सुट्टी असते. नेहमीची व रात्रभर विश्रांतीची आरोग्यधामे, हौशी प्रवासी केंद्रे आणि आरोग्यकारी विश्रामधामे यांचे जाळे सरकार पद्धतशीरपणे वाढवीत आहे, व त्यायोगे विश्रांती आणि फुरसदींचा वेळ मिळण्याच्या कष्टकरी जनतेच्या हक्काची हमी निर्माण होते. १९३९ साली सोविएत संघराज्यात ३६०० आरोग्यधामे व सुट्टीची विश्रामगृहे होती. त्यावेळी तीच मोठी यशःसिद्धी वाटणे उचित होते. १९६५ साली त्यांची संख्या ८०८० आणि १९८० साली १३,१४१ झाली. एका वर्षात त्यांनी ५ कोटी ७० लाख लोकांना फुरसदीच्या वेळच्या सवलती व वैद्यकीय मदत देण्यात आली. त्यांच्यापैकी जवळ जवळ एकतृतीयांश लोकांना देयपत्रे मोफत (त्यांचा

खर्च सामाजिक विमा निधीतून किंवा सरकारी अंदाजपत्रकातून दिला जातो) किंवा ७० टक्के खर्च माफ करून मिळाली होती.

बालवाडीतल्या एका बालकाच्या देखभालीचा खर्च सालिना ५५० रूबलहून अधिक येतो, तर पूर्वप्राथमिक शाळेत ४७० रूबलहून अधिक येतो. तथापि, मातापिता या रकमेपैकी एकपंचमांश खर्चच सोसतात. तरूण बालवीर छावण्यातून दरवर्षी १ कोटी ३० लाखांहून अधिक मुले आपली उन्हाळी सुटी घालवितात, त्या छावण्यांचा देखभालीच्या खर्चासाठी सरकारी अनुदानाच्या मोठ्या रकमांची तरतूद करण्यात आलेली असते. पूर्व–प्राथमिक शिक्षणाची व मनोरंजनाची यासारखी व्यवस्था कोणत्याही भांडवलदारी देशात अस्तित्वात नाही.

आपण ऊहापोह केलेल्या सर्व सामाजिक फायद्यांमुळे लोकांचे खरे उत्पन्न त्यांच्या नेहमीच्या वेतनाच्या मानाने साधारणपणे एकतृतीयांशाने वाढते. हे धोरण व हा व्यवहार यांचे उद्दिष्ट असे आहे की, सर्व लोकांना – मग त्यांची प्राप्ती काहीही असो, त्यांचे कुटुंब लहानमोठे केवढेही असो, आणि त्यांची प्रकृती कशीही असो– आधुनिक गाळ्याचे भाडे परवडले पाहिजे. नेहमीची विश्रांती व आपापल्या मुलांचे शिक्षण परवडेल अशी हमी निर्माण झाली पाहिजे. त्यायोगे सर्व नागरिकांना अत्यंत महत्त्वाचे सामाजिक फायदे उपभोगणे शक्य होते.

नवी मानवी मूल्ये

सोविएत कम्युनिस्ट पक्षाच्या आणि सोविएत सरकारच्या सर्व दस्तऐवजात लोकांचे भौतिक स्वास्थ्य सुधारण्याची घनिष्ट सांगड जनतेची सांस्कृतिक व आत्मिक पातळी उंचावण्याशी घातलेली असते.

जीवनाचा अर्थ काय आहे ? ह्या प्रश्नाने अनेक पिढ्यातील मोठमोठ्या विचारवंतांना संत्रस्त करून सोडले आहे.

आधुनिक भांडवलदारी समाजात यावर कडाक्याचे वाद होतात. बाजारपेठेत वस्तूंचा सुकाळ करणारे शक्तिशाली उद्योगधंदे भांडवलशाहीने उभे केले आहेत. अखिल मानवजातीच्या जीवनाला धोका निर्माण करणारे अवाढव्य युद्धोपयोगी उद्योग तिने उभारले आहेत, पण समाजातील सर्व नागरिकांच्या जीवनासाठी, कामासाठी आणि आत्मिक विकासासाठी माणुसकीच्या परिस्थितीची हमी निर्माण करणे, तिला शक्य झालेले नाही. मानवी व्यक्तिमत्त्वाची "संपन्नता" म्हणजे केवळ भौतिक संपत्ति असे समीकरण तिने मांडले असल्यामुळे, जीवनाचा अर्थ म्हणजे फक्त वस्तूंचा उपभोग घेणे, उपभोग्य वस्तूंच्या मागे धावणे, पैसा मिळविणे–एवढाच उरला आहे. फ्रेंच

लेखक आणि वाङ्मयीन समीक्षक आंद्रे वूर्मसर यांनी नमूद केले आहे की, मोलियर यांच्या सर्व हास्यकारी नाटकातून आणि बाल्झॅक यांच्या कादंबऱ्यातून पैशाशी निगडीत असे अडीअडचणींचे व कसोटी पाहणारे प्रसंग वगळले, तर त्यांची कथानके आपल्या डोळ्यासमोर गडगडतील. पाश्चात्य देशातील आधुनिक वाङ्मयाबद्दल देखील असेच म्हणता येईल. प्रत्येक सूत्र नफ्याभोवती, तो कमावणे व साठवणे याभोवती फिरते, आणि त्याच्यासाठी बाकी सगळ्याचा बळी दिला जातो.

माणूस काय विकत घेतो, किती संख्येने घेतो यावरून भांडलदारी समाज एखाद्या माणसाचे मूल्यमापन करतो. व्यक्तीच्या मालकीच्या भौतिक वस्तूंवरून त्याची किंमत मोजली जाते. याला अमेरिकन संशोधक पॉल हॉलंडर "नजरेत भरण्यासारखा उपभोग" म्हणतात...ते लिहितात :"... अमेरिकेच्या प्रत्येक प्रमुख शहरी भागात जुने श्रीमंत, फारसे जुने नसलेले श्रीमंत आणि नवे श्रीमंत असे श्रीमंताचे उच्चभ्रू थर असतात. कुटुंबे किती श्रीमंत आहेत यावरून देखील समाजाचे विभागीकरण, करण्यात येते. ज्यांच्याजवळ केवळ काही कोटी आहेत, ज्यांच्याजवळ कोट्यवधी डॉलर आहेत आणि ज्यांच्याजवळ शेकडो कोटी डॉलर आहेत, त्यांच्या दरम्यान संवेदनाक्षम अशा रेषा काढल्या जातात."

समाजातील सर्व थरात वस्तुविषयीचे वेडे आकर्षण निर्माण करणे, हावरटपणाने वस्तु गोळा करणे याविषयीची हाय हाय निर्माण करण्यासाठी सत्ताधारी वर्ग सर्वार्थाने झटत असतो, आणि हे करीत असताना लोकांना गरज नसलेल्या व आवडीच्या नसलेल्या वस्तु तर त्यांच्यावर भांडवलशाही लादतेच, पण अनेकदा त्यांना घातक असलेल्या वस्तुदेखील लोकांवर लादते.

भांडवलशाही व्यवस्थेत संस्कृती ही देखील एक वस्तूच असते. ज्यात नफा मिळत असेल, त्याचीच निर्मिती करायची, वस्तु कोणतीही असो, ती विकणे, हे मुख्य असते.

तंत्रशास्त्राच्या सिद्धींचा उपयोग करून आणि मुख्य म्हणजे प्रसार माध्यमांचा जो विकास झालेला आहे, त्याचा फायदा घेऊन आधुनिक भांडवलदारी समाजाने ही "संस्कृती" सुटे भाग जोडणाऱ्या पट्ट्यावर ठेवली आहे. हिंसा, खून, विकृती, भरपूर अश्लीलता असलेली पुस्तके व चित्रपट मोठ्या संख्येने ती निर्माण करीत असते. अमेरिकन दूरचित्रवाणी कंपन्यांचे कार्यक्रम म्हणजे संस्कृतीच्या परसातील टाकाऊ कचरा होय, असे वर्णन शिकागो शैक्षणिक दूरचित्रवाणीचे माजी अध्यक्ष आणि फेडरल नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष न्यूटन एन. मिनौ यांनी केले आहे. नफ्याच्या मागे लागून लोकांच्या सांस्कृतिक दर्जाचा बळी दिला जातो.



सुप्रसिद्ध बॅले नृत्यांगना गलिना उलान्योवा तालमीच्या वेळी बोल्शोय थिएटरमध्ये येक्तेरिना माक्सिमोवा यांच्या समवेत.

ते काहीही असले, तरी ही "संस्कृती" केवळ नफ्याचे उगमस्थान नाही; तर श्रमिक जनतेच्या प्रचंड समुदायांच्या सदसद्विवेक बुद्धीवर सत्तारूढ वर्गाचा सैद्धांतिक प्रभाव पाडण्याचे काम ती करते. लोकांना भ्रष्ट करून, नैतिक मूल्यांचा नाश करून ती कष्टकरी जनतेचे लक्ष, समाजाची मूलगामी पुनर्रचना करण्याच्या लढ्यापासून आणि असा लढा करणे शक्य आहे, या कल्पनेपासून देखील विचलित करते.


भौतिक संपत्ती वाढवीत असूनहि समाजसत्तावादी समाजजीवन म्हणजे वस्तूंचा उपभोग, उपभोगवादी पंथ, भौतिक संपन्नतेकडील वाटचाल असा त्याचा अर्थ करीत नाही. समाजसत्तावादी व्यवस्थेत, लोका-लोकांमधील संबंध कितपत मानवतावादी आहेत; लोकांचा सांस्कृतिक दर्जा काय आहे, आणि प्रत्येक व्यक्तीच्या अंगातील गुण व कुवत यांच्या विकासासाठी परिस्थिती कितपत अनुकूल आहे—या गोष्टींवर सामाजिक स्वास्थ्य अवलंबून असते.

सुसंवादी पद्धतीने विकसित झालेल्या लोकांचा समाज निर्माण करणे, हे समाजसत्तावादाचे उद्दिष्ट आहे. समाजसत्तावाद हे उद्दिष्ट केवळ डोळ्यापुढे ठेवीत नाही, तर ते हस्तगत करण्यासाठी प्रयत्न करतो. लिओनिद ब्रेझ्नेव यानी म्हटले होते : "कम्युनिस्ट उभारणीच्या मार्गावर आपण जसजसे पुढे जात आहोत, तसतशी आपली अर्थव्यवस्था भक्कम होत चालली आहे; आणि लोक जेवढे अधिक सुखी—समाधानी आहेत, तेवढे त्यांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, नैतिक आणि सौंदर्यशास्त्रीय शिक्षण करण्याच्या कार्याचे महत्त्व अधिक होत जाते. भौतिक आणि आत्मिक विकासाच्या दरम्यान दरी निर्माण होऊ देणे इष्ट नाही. त्यायोगे कटकटीच निर्माण होतील."


व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी समाजसत्तावादी समाज कोणत्या प्रकारची परिस्थिती निर्माण करीत आहे, त्याचे वर्णन आम्ही या पूर्वीच्या प्रकरणात केले आहे. समाजसत्तावादी समाजात भौतिक फायदे हे काही अंतिम साध्य नव्हे, तर सांस्कृतिक विकासाची ती आवश्यक साधने असतात. संस्कृती म्हणजे आम्ही फक्त साहित्य आणि कला असे मानीत नाही, तर माणसाच्या बौद्धिक, आत्मिक व शारीरिक अशा सर्व गुणांचा विकास होण्यास अनुकूल असा जीवनाच्या व कामाचा परिसर निर्माण करणाऱ्या सर्व बाबी म्हणजे संस्कृती होय.

सोविएत जनतेची सांस्कृतिक संपन्नता कशी दिसून येते ?

प्रथमतः, त्यांच्या कम्युनिस्ट जागतिक दृष्टिकोनात ती दिसून येते. सुप्रसिद्ध सोविएत शिक्षणतज्ज्ञ वासिली सुखोमलिन्स्की यांच्या मते माणसात असायला हवी अशी ही मुख्य गोष्ट होय. त्यांनी आपल्या मुलाला उद्देशून लिहिले आहे की, "सैद्धांतिक बांधिलकी', 'कल्पना'—हे शब्द थोर व पवित्र आहेत; आणि जे समजून उमजून किंवा



[illegible] विषयक संस्थेतील नव्या गणकयंत्राच्या कार्यक्रमावर संशोधन



त्रविषयक प्रगतीच्या व्यापक कार्यक्रमाची तपशीलवार आखणी करा व तो अंमलात आणा" आणि "ज्ञान व उत्पादन यांच्यातील दुवे बळकट करा."

नकळत मानवी सैद्धांतिक बांधिलकीचे सौंदर्य मध्यमवर्गीय आत्मसंतुष्टतेच्या, उदासीनतेच्या आणि अडाणी, संकुचित वृत्तीने उपाहास करून कोळयाच्या जाळया–जळमटांनी कलंकित करतात, ते मानवजातीवरच हात उगारतात. सैद्धांतिक बांधिलकी हीच खरीखुरी मानवतावादी वृत्ती होय... कल्पना, विचार आहेत म्हणूनच माणसाला त्याचे व्यक्तीमत्व लाभते, सर्जनशील कार्यातील त्याची किंमत दिसून येते आणि कोणत्या ना कोणत्या ध्येयासाठी तो लढवय्या होऊ शकतो, हे स्पष्ट आहे." कम्युनिस्ट जागतिक दृष्टिकोनामुळे माणसाच्या जीवनाला एक हेतू लाभतो, त्याचे जीवन अर्थपूर्ण होते आणि त्याचे श्रम जाणीवपूर्वक व निर्मितीक्षम होतात; घटनांमधील आशय ओळखण्याची त्याची कुवत वाढते आणि त्याच्यात मानवतावादी वृत्ती बाणवते.

दुसरे असे की, सोविएत जनतेची आत्मिक संपन्नता तिच्या सामाजिक हालचालीत, सामाजिक श्रमाकडे पहाण्याच्या तिच्या निर्मितीक्षम दृष्टिकोनात, उत्पादनाची व्यवस्था व सरकारचा समग्र कारभार चालविण्यात असलेल्या त्यांच्या सहभागात दिसून येते. बोल्शेविक राज्यसत्ता टिकवू शकतील का? ह्या १९१७ सालच्या महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीच्या आधी लिहिलेल्या लेखात लेनिन यांनी म्हटले आहे की "...फक्त श्रीमंत, किंवा श्रीमंत कुटुंबातून निवडलेले अधिकारीच राज्याचे प्रशासन करण्यास, कारभार चालविण्याचे सर्वसामान्य दररोजचे काम करण्यास समर्थ आहेत, ह्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनापासून आपण तात्काळ फारकत घेतली पाहिजे, अशी आमची मागणी आहे." जगातील पहिल्या समाजसत्तावादी देशात ह्या पूर्वग्रहावर केव्हाच मात करण्यात आलेली आहे. सोविएत राजवटीत लक्षावधी लोक व्यवस्थापन व प्रशासन या कामात सहभागी झालेले आहेत; आणि नव्या सरकारचे आपण पूर्णतया मालक असल्याचे त्यांनी सिद्ध केले आहे.

तिसरे म्हणजे, नव्या सामाजिक नीतिमत्तेचा विकास व दृढीकरण यात ती दिसते. कष्टकरी जनतेच्या मागील पिढयांनी जोपासलेले उद्योगशीलता, सचोटी, नम्रता, परस्पर–साहाय्य, बंधुभाव ह्या सद्गुणांचा सुंदर मिलाफ कामगार वर्गाने विकसित केलेल्या–सामुदायिक वृत्ती, देशभक्ती, आंतरराष्ट्रीयत्व सदसद्विवेक आणि शिस्त यांच्याशी झालेला असून या दोघांचे प्रत्यंतर नव्या सामाजिक नीतिमत्तेत येते.

ही नवी नीतिमत्ता समग्र जनता हळूहळू आत्मसात करून घेत आहे. भांडवलशाही जगतात अस्तित्वात असलेल्या मूल्यविषयक पद्धतीपेक्षा वेगळी पद्धती समाजसत्तावादी जगतात अस्तित्वात आली आहे व कार्यान्वित झाली आहे, असे निष्कर्ष सोविएत संघराज्यातील समाजशास्त्रीय अभ्यासकांनी काढले आहेत. तुम्हाला जास्तीत जास्त समाधान कशातून मिळते आणि आत्मजाणीवेची शक्यता कशात वाटते, असे

विचारले की लोक सांगतात–पहिली गोष्ट म्हणजे आवडणारे काम, दुसरे–शिक्षण, किंवा आणखी नेमके सांगायचे म्हणजे आपली शैक्षणिक पातळी उंचावणे आणि तिसरे भौतिक स्वास्थ्य.

या क्षेत्रातील सर्व प्रश्न सोडविण्यात आलेले नाहीत, हे नक्कीच. मधून मधून, समाजसत्तावादी परिस्थितीत देखील जुन्या चालीरीती, आणि दृष्टिकोन डोके वर काढीतच असतात; उदाहरणार्थ, काही प्रकरणी उपभोगवाद, कामाकडे गंभीरपणे न पहाण्याची वृत्ती, आणि समाजसत्तावादी सामूहिक जीवनपद्धतीचे नियम मोडण्याचे विविध प्रकार. या घटनांकडे पक्षाने आपल्या समाजाचे लक्ष अनेकदा वेधले व या गोष्टी नाहीशा करण्याचे मार्ग व पद्धती निर्देशित केल्या; आणि त्यांच्याविरूद्ध प्रखर लढ्यास पाठिंबा दिला.

मानवी संस्कृतीच्या सर्वोत्तम अशा सर्व यशःसिद्धी व्यापक जनसमुदायांना उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सोविएत राजवटीच्या कालखंडात पक्षाने सातत्याने केले. क्लारा झेट्किन या जर्मन कम्युनिस्ट नेत्या असलेल्या स्त्रीशी बोलताना लेनिन यांनी म्हटले होते की, "...आमच्या कामगार आणि शेतकऱ्यांना केवळ भडक करमणुकीपेक्षा काहीतरी चांगले दाखविणे अगत्याचे आहे. थोर कला त्यांच्यापर्यंत पोचवली पाहिजे." ह्या कार्याकडे कधीही दुर्लक्ष करण्यात आलेले नाही. सर्व प्रजासत्ताकात नव्या नाट्यगृहांची उभारणी, हौशी कलाकारांच्या हालचालींचा वेगवान् विकास, संस्कृती सदने व प्रासाद यांची बांधणी, शिक्षण "स्फोट" इ. जागतिक वाङ्मयात जे जे सर्वोत्तम आहे त्याचे प्रचंड प्रमाणावर प्रकाशन–हे सारे लेनिन यांनी निर्देशिलेल्या मुख्य उद्दिष्टानुसारच करण्यात येत आहे.

* * *

खूप वर्षांपूर्वी, जेव्हा सोविएत संघराज्यात विकसित समाजसत्तावादी समाज तोपर्यंत उभारलेला नव्हता, जेव्हा महत्त्वाचा आर्थिक निर्देशांकांच्या बाबतीत आमचा देश अमेरिकेच्या खूप मागे होता, तेव्हा अमेरिकन अध्यक्षांच्या पत्नी इलियानॉर रुझवेल्ट म्हणाल्या होत्या, विषय कोणताहि असो: अमेरिकेत काय चालले आहे, याची तुलना सोविएत संघराज्यात काय चालले आहे, याच्याशी अपरिहार्यपणे करण्यात येई.

आज अधिक तुलना करण्यात येत आहेत.

या पृथ्वीतलावर भांडवलशाही साडेतीन शतके अस्तित्वात राहिलेली आहे. तिला आपली जीवनपद्धती निश्चित करायला, तिच्या सर्व सुप्तशक्तींचे दर्शन घडवायला एवढा कालावधी पुरेसा होता. या कालखंडात आपले मोल दाखवून देण्याची भरपूर संधी भांडवलशाहीला मिळाली.

समाजसत्तावाद फक्त ६५ वर्षांचा आहे, त्यापैकी २० वर्षे सोविएत जनतेवर लादलेल्या दोन युद्धात आणि युद्धोत्तर पुनर्वसनासाठी खर्च झाली. या छोटया कालावधीत सोविएत जनतेने सर्व क्षेत्रात लक्षणीय यश मिळविले आहे, आणि अशा विकसित समाजसत्तावादी समाजाची उभारणी केली, की जो आत्मविश्वासाने, संथपणे व हेतुपूर्ण रीतीने पुढची वाट चालत आहे.

दोन परस्परविरोधी व्यवस्थांच्या जीवनपद्धतींची तुलना करताना आपण दोन महत्त्वाच्या परिस्थिती लक्षात ठेवल्या पाहिजेत.

पहिले म्हणजे, समाजसत्तावाद हा आधीच्या समाजातून विकसित झाला आणि दैनंदिन जीवनात व आर्थिक आणि नैतिक क्षेत्रातील अवशेष बरोबर घेऊन पुढे चालला आहे. याचे प्रत्यंतर कसे येते? अंगमेहनत करणाऱ्या बहुसंख्य कामगारांची सांस्कृतिक पातळी बौद्धिक काम करणाऱ्यांच्या मानाने अजून खालची आहे. अद्यापहि, शहरी व ग्रामीण भागातील राहणीत फरक आहेत. आर्थिक विषमता आहे, तिची चर्चा याआधीच्या प्रकरणातून करण्यात आलेली आहे: कसबी कामगारांना बिनकसबी कामगारांपेक्षा कितीतरी अधिक वेतन देण्यात येते, संतती नसलेल्या कुटुंबाच्या मानाने जास्त मुले असलेल्या मोठ्या कुटुंबाचे दरडोई उत्पन्न कमी असते. लेनिन यांनी म्हटले होते: "कम्युनिझमच्या पहिल्या टप्प्यात . . .न्याय आणि समानता ताबडतोब मिळू शकणार नाही; भेदाभेद आणि संपत्तीच्या बाबतीतील अन्याय्य तफावत अजूनही शिल्लकच असेल, पण माणसाची माणसाकडून होणारी पिळवणूक अशक्य होईल, कारण उत्पादनाची साधने: गिरण्या, यंत्रे, जमीन इत्यादी बळकाविणे, त्यांची खाजगी मालमत्ता बनविणे अशक्य होईल." त्याबरोबरच, ज्यायोगे जीवनपद्धती निश्चित होते, अशा प्रत्येक गोष्टीचा विकास होऊन समाजसत्तावादी व्यवस्थेत मूलभूत बदल घडून येतील. भूतकाळातील अवशेषातून समाज स्वतःला हळूहळू मुक्त करून घेतो; आर्थिक विषमता कमी करण्यासाठी बरेच काही करण्यात येत आहे; "मागासलेले दूरवरचे प्रदेश ही संकल्पनाच नष्ट झाली आहे; नवी नीतिमत्ता, नवे नैतिक निकष आणि वागणुकीचा नवा दर्जा सुनिश्चित करण्यात आलेला आहे.

दुसरे असे की, विकसित भांडवलदारी देशांची जीवनपद्धती केवळ काही वर्गांची दुसऱ्यांकडून होणाऱ्या पिळवणुकीपासून नव्हे, तर इतर राष्ट्रांच्या पिळणुकीपासूनहि ती वेगळी काढता येणार नाही. आधी गुलामांच्या व्यापारातून पैसा मिळवला जाई, मग वसाहती कबजात घेऊन, आणि आता आपल्या कालखंडात भांडवलाची निर्यात करून व इतर लोकांची आर्थिक पिळवणूक करून, विषम व्यापारी विनिमय करून पैसा मिळविण्यात येतो.

गेल्या तीस वर्षात, एकेकाळच्या जवळजवळ सर्व वसाहतींनी राजकीय स्वातंत्र्य मिळविले. परंतु भांडवलदारी देश त्यांची संपत्ति शोषून घेतच आहेत. खरोखर, अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून नवजात राष्ट्रांचे मुत्सद्दी आणि सार्वजनिक नेते चिंता-युक्त स्वरात दाखवून देतात की, हे शोषणाचे प्रमाण वाढते आहे. आणि अशी मागणी करतात की, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेत मूलभूत बदल होणे आवश्यक आहे. आजही भांडवलशाही जगतातील प्रमुख राष्ट्रांना पूर्वीप्रमाणेच विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक पिळवणुकीतून हजारो, लाखो–अब्जावधी डॉलर मिळतात. त्यामुळे, विकसनशील देश–उदाहरणार्थ, तेलाची निर्यात करणारे–जेव्हा एकत्र येतात आणि आपले आर्थिक हितसंबंध निश्चयपूर्वक जपायला लागतात, तेव्हा भांडवलदारी देशांतील वृत्तपत्रे संकटाचा भोंगा वाजवितात, यात मुळीच आश्चर्य नाही.

समाजसत्तावाद, अर्थातच, अशा पायावर आपली जीवनपद्धती विकसित करू शकत नाही. समाजसत्तावादी समाजात जे जे निर्माण करण्यात आले आहे, ते आमच्याच साधनांनी व आमच्याच बचतीतून उभारण्यात आलेले आहे.

शेवटचे चार शब्द

ह्या पुस्तिकेचे अखेरचे चार शब्द लिहित असताना काही बाबींची चर्चा करणे शक्य झाले नसल्याचे लेखकाला जाणवत आहे. वाचकाच्या हे लक्षात आले असेल की, लेखकाने समाजसत्तावादी जीवनपद्धतीच्या ज्या खास वैशिष्टचांचे मोजमाप सामान्या रीत्या मान्य व साध्या फूटपट्टचांनी घेणे शक्य आहे, त्यांचीच चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे: उदाहरणार्थ, रोजगाराचा दर्जा, व्यवस्थापनातील कामगारांच्या भागीदारीचे प्रमाण, सेवानिवृत्तीचे वय, शैक्षणिक पातळी वगैरे. प्रत्यक्ष तुलना करणे शक्य असल्याने ह्या दृष्टिकोनाचे कदाचित समर्थन करता येईल.

सोविएत समाजातील वातावरण ह्या विषयाकडे लक्ष दिल्याशिवाय आमच्या जीवनपद्धतीबाबतची चर्चा पुरी होणार नाही; ते स्वाभाविकही आहे. कारण, प्रत्येकाच्या जीवनाच्या व कार्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. कदाचित ते कसे असेल याचा अंदाज वाचकाला मागील पाने वाचल्यानंतर आला असेल; तरीहि लेखकाला असे वाटते की, त्याचे स्वतंत्र वर्णन करणे अगत्याचे आहे.

आता, सोविएत समाजातील वातावरण कशामुळे निश्चित होते?

दि टाईम्स चे जे थोडे रशियन भाषा जाणणारे परदेशी प्रतिनिधी आहेत, त्यांच्यापैकी किरिल तिद्‌मार्श यांनी पंधरा वर्षांपूर्वी पाठवलेले एक वार्तापत्र मला इथे आठवते. (सोविएत जनतेशी कमी अधिक संवाद साधल्याशिवाय परदेशी प्रतिनिधी आमच्या देशाविषयी माहिती कशी काय मिळवू शकतात, हे काही माझ्या ध्यानात आलेले नाही, आमच्याकडच्या क्लबात, थिएटरात किंवा जलशांना ते जात नाहीत म्हणून की, काय?—आणि त्यांना भाषा येत नसेल, तर त्यांनी का जावे? म्हणून त्यांना सोविएत संघराज्यातील जीवन "बेचव", "नीरस" आहे, असे वाटत असावे? त्यांना रशियन भाषा येत नसल्यामुळे सोविएत वाङ्मयाचे जग त्यांना 'अज्ञात प्रदेशा' सारखे, वाटत असेल का?) तिद्‌मार्श यांनी आमच्या जीवनाच्या मूलभूत महत्वाच्या वैशिष्टचाविषयी लिहिले. किरिल तिदमार्श हे ते वैशिष्टच ओळखणारे काही पहिले परदेशी

पत्र-प्रतिनिधी नाहीत, मग त्यांचे वार्तापत्र मला का आठवावे, ते सांगणे कठिण आहे. नव्या प्रकारच्या घटनेला सामोरे जाताना तिद्मार्श सारखा बुद्धिमान माणूस देखील भांडवलदारी विचारांचा बंदी राहू शकतो, ही गोष्ट माझ्या मनात ठसली असावी. तिद्मार्श यांनी लिहिले होते : "नोकरी जायची फार थोडी भीती इथे आहे. अधिक चांगली परिस्थिती आणि संधी शोधण्यासाठी कुठे जावे, ही चिंता इथे अजिबात नाही ... किमान जीवनाचा दर्जा इथे उपलब्ध होईलच अशी हमी नेहमी असते." यानंतर त्यांनी असा युक्तिवाद केला की नोकरी जाण्याची भीती नसणे, फारसे चांगले नाही, कारण अशा परिस्थितीत माणूस आपल्या सर्व कुवती एकवटून काम करीत नाही म्हणून उत्पादनक्षमतेच्या विकासास पायबंद बसतो.

यात गर्भित अर्थ असा आहे की भीती आवश्यक आहे, लोकांना उद्याची धास्ती वाटायलाच हवी.

तिद्मार्श यांच्या युक्तिवादात असमाधानकारक असे पुष्कळच आहे. सोविएत जनता अधिक चांगल्या परिस्थिती व संधी शोधीत नाहीत, असे म्हणणे हास्यास्पद आहे. मानवतेला स्पर्श करणारे काहीहि आम्हाला माहित नाही, असे नाही. अधिक चांगली परिस्थिती व संधी मिळाली म्हणूनच काही लोक सैबेरियात काम करायला जातात, तर काही तिथून दुसरीकडे जातात; काम न थांबविता काही लोक सायं-काळच्या शाळात शिकतात किंवा उच्चतर शिक्षण-संस्थाच्या पत्रव्यवहार विभागा-मार्फत शिक्षण घेतात; आणि लोक एका कारखान्यातून दुसऱ्यात बदली करून घेतात. मुख्य मुद्दा असा आहे की, नव्या समाजातही आम्ही आपल्या कुवती फक्त बेकारीच्या भीतीनेच किंवा प्रतिकूल परिस्थितीसाठीच दाखवाव्यात–एवढयासाठीच काही आम्ही १९१७ सालची क्रांती घडवून आणलेली नाही.

परंतु, सोविएत लोकांना काम जाण्याची अजिबात भीति वाटत नाही किंवा उद्याची भीति नाही हे किरिल तिद्मार्श यांचे म्हणणे मात्र तंतोतंत खरे आहे. भीती ही एक शक्तिशाली प्रेरणा आहे, हे नक्की. परंतु ती काही सर्वात शक्तिमान, सर्वात परिणामकारक प्रेरणा नव्हे. कामावरचे प्रेम, निर्मितीक्षम संशोधन हा आमच्या नीतिमत्तेचा एक मूलभूत घटक आहे.

सोविएत समाजातील वातावरण एखाद्या बाबतीतील भीतीने निश्चित केले जात नाही, तर एकमेकांविषयीच्या सदिच्छेने, परस्पर-साहाय्याने व मित्रत्वाने निश्चित केले जाते; लोकांच्या आत्मकेंद्रित वृत्तीने नव्हे, त्यांच्या मनमोकळेपणाने निश्चित केले जाते. ही प्रवृत्ती नव्या पिढीच्या अंगी बाणावी म्हणून आम्ही शाळेत आणि कुटुंबात, पुस्तकाद्वारे आणि दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमाद्वारे प्रयत्न करीत असतो. अशा प्रयत्नांनी आमचे जीवन ओथंबून निघालेले असते. नव्या समाजातही नियमाला अपवाद

आहेत, आमच्या नैतिक तत्त्वांच्या विरूद्ध वर्तन करणारे लोक आहेत — हे मुद्दाम सांगायला नको. परंतु, आपण प्रमुख, निर्णायक प्रवृत्तींविषयी बोलत आहोत.

मैत्रीचे वातावरण खास करून संकटाच्या वेळी स्पष्ट दिसून येते. अलिकडेच, सुप्रसिद्ध लेखक अलेस अदामोविच* हे श्वेत रशियन आणि दानिइल ग्रानिन ** हे रशियन या दोघांनी मिळून नाझींनी वेढा दिलेल्या (१९४१–४४) युद्धकालीन लेनिनग्राद विषयी एक पुस्तक प्रकाशित केले आहे. त्या नाकेबंदीच्या काळात लेनिनग्रादमध्ये राहिलेल्या लोकांच्या मुलाखतींवर आणि तत्कालीन लेनिनग्रादवासियांच्या रोजनिशीं-वर आधारलेले असे हे पुस्तक आहे. सोविएत संघराज्याच्या वैज्ञानिक अकादमीच्या पुराणवस्तु संग्राहालयाचे संचालक जॉर्जी क्न्याझेव यांनी त्या नाकेबंदीच्या जीवघेण्या उपासमारीच्या महिन्यांविषयी लिहून ठेवले आहे: “लोकांशी संबंध ठेवताना अत्यंत सभ्य आणि सौजन्यशील रहाण्याचा मी अंगातील सर्व शक्तीनिशी प्रयत्न करतो. माझ्या-जवळ भाकरी नाही, पण माझ्यापाशी आनंददायी, दयाळू भाषा आहे. ती काही भाकरीची उणीव भरून काढू शकत नाही . . . पण . . .” वेढ्यात पडलेल्या लेनिन-ग्रादमधील अनेक लोकांना असेच वाटले व त्यांच्या भावनाही अशाच होत्या. जिथल्या रहिवाशांनी प्रचंड ताण आणि खडतर अडचणी सोसल्या, त्या शहरातील वातावरण हे असे होते. मित्रत्त्वच्या या वातावरणाने लेनिनग्रादवासियांना मदत झाली. त्यांची लढण्याची जिद्द आणि दृढनिश्चय अचल झाला. शांततेच्या काळात देखील मित्रत्त्वाचे व परस्पर सहाय्याचे वातावरण हे आमच्या जीवनाचे खास वैशिष्ट्य असते. उदाहरणार्थ १९६६ साली भूकंपात ताश्कंद† नष्ट झाले व दाघेस्तान ‡ ची, बरीच हानी झाली तेव्हा या आपत्तींना बळी पडलेल्यांच्या मदतीला सर्व संघ-प्रजासत्ताके धावून आली.

सोविएत जनतेची परकीयांकडे पाहण्याची वृत्तीही मित्रत्वाचीच आहे. इतर लोकां-पेक्षा आपण कुणीतरी वरचढ आहोत, उर्मटपणा आणि मडक माथेफिरूपणा या गोष्टी आम्हाला परिचित नाहीत; इतर लोकांना आम्ही वैरभावाने किंवा पूर्वग्रहाने

---

* अलेस अदामोविच् (जन्म–१९२७) सोविएत श्वेत रशियन लेखक आणि वाङ्मयीन टीकाकार, **दि पार्टिझन्स** या कादंबरीचे लेखक.

** दानिइल ग्रानिन (जन्म–१९१९) सोविएत रशियन लेखक, **दोज हू सीक** व **गोइंग इण्टू द स्टॉर्म** या कादंबऱ्यांचे कर्ते.

† सोविएत उझ्बेकिस्तानची राजधानी.

‡ रशियन फेडरेशनचा भाग असलेला उत्तर कॉकेशसमधील दाघेस्तान स्वायत्त सोविएत समाजसत्तावादी प्रजासत्ताक.

वागवीत नाही. उलटपक्षी, इतर लोकांची दुःखे व आनंद सोविएत लोक स्वतःचीच मानतात, आणि अनेकदा त्यांनी गरजेच्या काळात इतर लोकांना मदत केलेली आहे. रशियन लोकांनी जगाला सतत समजून घेतले आणि इतर लोकांच्या मूल्यांचे कौतुक केलेले आहे. सोविएत संघराज्यात हौशी प्रवासी म्हणून किंवा व्यापारी म्हणून आलेला कोणीहि रस्त्यातील लोकांशी बिनदिक्कत बोलू शकतो. आमच्या देशात परदेशी नागरिकाला नेहमीच मदत केली जाते, मार्ग दाखवला जातो आणि आवश्यक ते स्पष्टीकरण केले जाते.

श्रमिक जनतेला एकमेकांविषयी शत्रुत्त्व वाटण्याचे काहीहि कारण नाही, या विश्वासावर आमचे मित्रत्व आधारलेले असते.

"आपले घर तुम्हाला प्रिय असेल तर" हा अनुबोधपट मी अनेकदा पाहिला आहे; तो नाझी जर्मनीविरूद्ध झालेल्या युद्धाच्या प्रारंभीच्या काळाविषयीचा आहे. त्यातला एक प्रसंग येताच श्रोतृवर्ग एकदम कसा गप्प होतो, हे मी प्रत्येकवेळी पाहून ठेवले आहे: स्मोलेन्स्क जवळ दयाळू रशियन किसान स्त्रिया, पहिल्या जर्मन युद्ध कैद्याला ताजे दूध देतात. ज्या जर्मन तरुणांना फसवून युद्धात ओढण्यात आले आहे, त्यांची चूक त्यांना लौकरच कळेल आणि मग ते आपापल्या मशीनगन्स उलट्या बाजूला वळवतील, अशी रशियन स्त्रियांची खात्री होती. ह्या स्त्रियांना अद्याप या अगांतुक पाहुण्यांचे खरे स्वरूप माहित नव्हते किंवा ते सोविएत जनतेला केवढ्या प्रचंड हानीमध्ये लोटणार आहेत, हेही ठाऊक नव्हते. प्रख्यात सोविएत लेखक आणि कवी कोन्स्तन्तिन सिमोनोव * यांचे शब्द श्रोत्यांच्या कानावर पडले, "युद्धापूर्वी आम्ही या रशियन महिलांना शिकविले होते की, विविध देशातील कामगार, शेतकरी आणि सर्व कष्टकरी जनता एकमेकांशी वैरभाव बाळगणेच शक्य नाही, ते आपले वर्गबंधू आहेत आणि त्यांचे हितसंबंधही समान आहेत.

स्मोलेन्स्कमधील सामुदायिक शेतांवरील स्त्रियांनाच युद्धाच्या प्रारंभीच्या काळात तसे वाटले असे नाही. नाझीवाद आणि वंशवाद यांचे विष कोट्यवधी जर्मनांच्या मनात एवढे खोलवर रूजले आहे आणि ते इतर लोकांना खरोखरच 'निकृष्ट मानव' मानतात, हे आम्हाला तेव्हा ठाऊक नव्हते."

आम्ही लोकांना जे शिकवले होते, ते बरोबर होते का?

आम्ही बरोबर होतो, हे आम्हाला आज कळते आहे. होय, युद्ध काळात आम्ही प्रचंड संताप आणि द्वेष यांचा अनुभव घेतला, परंतु भ्रातृभावाची उच्च तत्वे आम्ही

---

* कोन्स्तान्तिन सिमोनोव [१९१५-७९], सोविएत कवी, लेखक व सार्वजनिक कार्यकर्ते, **दिवस व रात्री** या कादंबरीचे, जिवंत आणि मृत या त्रिखंडात्मक कादंबरीचे व अन्य ग्रंथांचे कर्ते.

कायम ठेवली. ज्यांचा मी आधी उल्लेख केला, त्या जॉर्जी कन्याझेव यांनी **'वेढयात पडलेले लेनिनग्राद'** या पुस्तकात लिहिले आहे : "नाझी अत्याचाराइतकीच मला संकुचित राष्ट्रवादाची भीती वाटते. आमच्यावर हल्ला करणाऱ्या गिधाडांपासून संरक्षण म्हणून केलेले युद्ध आम्हाला पवित्र वाटते, पण एका देशातील लोकांनी दुसऱ्यांवर वर्चस्व गाजवण्यासाठी केलेल्या युद्धाचे महत्व आम्हाला नाही." शत्रूच्या लांब पल्ल्याच्या उखळीच्या तोफांनी वेढलेला उपासपोटी आणि थंडीने गारठलेल्या शहरातल्या माणसाची चिंता होती, ती अशी !

आणि, शेवटी सांगायचे म्हणजे आमच्या जीवनाच्या वातावरणाचे वैशिष्टय म्हणजे आनंद : सोविएत लोक समाजात मिसळणारे आहेत; आनंदाने गावे, नाचावे असा जल्लोष करावा; प्रेम करावे आणि प्रेम करून घ्यावे, असे त्यांना वाटते.

होय, सोविएत समाजातील वातावरण अद्वितीय आहे. जेव्हा एकादा सोविएत नागरिक आपल्या कर्तव्यकर्मासाठी आपल्या मायदेशापासून दूर जातो, तेव्हा त्याला या वातावरणाची फार फार आठवण येते. आगगाडीत प्रवास करताना एखाद्या सहप्रवाशाशी आपण कोणत्याहि विषयावर संभाषण सुरू करु शकतो, अशा बोलक्या सहप्रवाशाची आठवण आपल्याला येते. बर्फाच्छादित गल्लीत बुद्धीबळे खेळता खेळता उष्णता निर्माण करण्यासाठी पाय आपटणाऱ्या निवृत्तिदारांची त्याला आठवण येते. जॉर्जियन किंवा एस्तोनियन पद्धतीने हेल काढून बोललेल्या रशियन भाषेतील भाषणांनी गाजलेले गोलमेजाभोवतालचे जल्लोष केलेले उत्सव त्याला आठवतात. अनेक गोष्टींची त्याला आठवण येते. आमच्या देशात जसे नाना प्रकारचे लोक आहेत, तशीच आमची सोविएत जीवनपद्धती संपन्न आणि विविधतेने नटलेली आहे.

प्रिय वाचक, आमच्या जीवनपद्धतीविषयी तुमच्या प्रश्नांना उत्तरे मिळालेली नाहीत, एखादी गोष्ट पुरेशा स्पष्टतेने मांडली गेली नाही किंवा तिचे स्पष्टीकरण झालेले नाही, असे तुम्हाला वाटल्यास आम्हाला अवश्य कळवा. लेखक आणि त्याचे प्रकाशक या पुस्तिकेची नवी आवृत्ती तयार करताना तुमच्या इच्छा आणि तुमची टीका-टिप्पणी विचारात घेतली जाईल.

Marathi

[illegible]